SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

५७ वा वार्षिक अहवाल २०१९-२०

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजवंदन करताना मा. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे
यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी शेजारी समारंभाचे प्रमुख पाहुणे
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू प्रा. (डॉ.) उद्धव भोसले

मा. श्री. भगतसिंह कोश्यारी

कुलपती

मा. प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे

कुलगुरू

(दि. १७ जून, २०२० पर्यंत)



मा. प्रा. (डॉ.) नितीन र. करमळकर

प्रभारी कुलगुरू

(दि. १८ जून, २०२० पासून)

मा. प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के

प्र–कुलगुरू

(दि. १७ जून, २०२० पर्यंत)

५६ व्या दीक्षान्त सोहळ्याचे प्रमुख पाहुणे मा. कुलपती श्री भगतसिंह कोश्यारी, यांच्या समवेत मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, मा. कुलसचिव, मा. प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखाधिकारी आणि व्यवस्थापन परिषद सदस्य

शिवाजी विद्यापीठाच्या
५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने
आयोजित दोन दिवसीय ग्रंथ
महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी सहभागी
स्टॉलवरील पुस्तकांची पाहणी करताना
कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत (डावीकडून)
प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, ज्ञानस्रोत केंद्र
संचालक डॉ. नमिता खोत,
अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव,
कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,
परीक्षा संचालक गजानन पळसे,
अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत

शिवाजी विद्यापीठाच्या कॉफी टेबल
बुकचे प्रकाशन करताना
कुलपती भगतसिंह कोश्यारी.
सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे,
प्रा. भूषण पटवर्धन यांच्यासह
अधिकार मंडळांचे सदस्य.

शिवाजी विद्यापीठाच्या
५६व्या दीक्षान्त समारंभात
कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी
यांचे विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह
देऊन स्वागत करताना
कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

शिवाजी विद्यापीठाच्या
५६व्या दीक्षान्त समारंभात
मार्गदर्शन करताना
महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे
कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी.

शिवाजी विद्यापीठाच्या
५६व्या दीक्षान्त समारंभात
स्नातकांना दीक्षान्त उपदेश करताना
समारंभाचे प्रमुख अतिथी विद्यापीठ
अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष
डॉ. भूषण पटवर्धन.

शिवाजी विद्यापीठाच्या
५७ व्या वर्धापनदिन समारंभात बोलताना
प्रमुख पाहुणे व नांदेडच्या स्वामी रामानंद
तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे
कुलगुरू डॉ. उद्धव भोसले.
व्यासपीठावर (डावीकडून)
कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,
कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे,
प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के.

शिवाजी विद्यापीठाच्या
५७ व्या वर्धापन दिन समारंभात
छत्रपती शिवाजी महाराजांच्या
अश्वारुढ पुतळ्याच्या प्रतिकृतीचे
अनावरण प्रसंगी
कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे
व कुलगुरू डॉ. उद्धव भोसले.

शिवाजी विद्यापीठाच्या
नूतन फोल्डरचे अनावरण करताना
कुलगुरू डॉ. उद्धव भोसले.
व्यासपीठावर कुलगुरू
डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह
प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के,
कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

शिवाजी विद्यापीठाच्या
बॅचचे अनावरण करताना
कुलगुरू डॉ. उद्धव भोसले.
व्यासपीठावर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे
यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के,
कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

शिवाजी विद्यापीठातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील आणि डॉ. के. वाय. राजपुरे.

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. एस. एस. चव्हाण. व्यासपीठावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

विद्यापीठ गुणवंत सेवक पुरस्कार स्वीकारताना मनोहर कुलकर्णी.

विद्यापीठ गुणवंत सेवक पुरस्कार स्वीकारताना लक्ष्मण परीट.

महाविद्यालयीन गुणवंत प्राचार्य पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे.

बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. भरत नाईक.

शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग रोजगार व कौशल्य विकास मेळाव्यास मूकबधीर, अंध, अस्थिव्यंग अशा सुमारे २९६ उमेदवारांनी नोंदणी केली व उपस्थिती दर्शविली. यापैकी ८० जणांची त्याच दिवशी विविध पदांवर निवड झाली.

महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह शिक्षक, अधिकारी,कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यात निरा येथे आषाढी वारीचे स्वागत करण्याबरोबरच 'निर्मल वारी, हरित वारी' अभियान राबविण्याचा निर्धार केला. वारीसमवेत चालताना वारकऱ्यांच्या सेवेबरोबरच या स्वयंसेवकांनी या अभियानाअंतर्गत कृती कार्यक्रमही राबविला. या उपक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड उपस्थित होते.

खालापूर (मुंबई) येथील एनडीज् आर्ट वर्ल्डसमवेत सामंजस्य करार प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत (डावीकडून) वित्त व लेखाधिकारी व्ही. टी.पाटील, अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, उपमहापौर भूपाल शेटे, अरुण सातपुते.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर बोलताना अमेरिकेतील हार्वर्ड केनेडी स्कूल येथील डॉ. सूरज येंगडे. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. श्रीकृष्ण महाजन.

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागामध्ये भाभा अणू संशोधन (बीएआरसी) सहकार्याने इंडियन एनव्हॉयर्नमेंटल रेडिएशन मॉनिटरिंग नेटवर्क (IERMON) ही सुविधा प्रस्थापित करण्यात आली. तिो औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, पदार्थविज्ञान अधिविभाग प्रमुख तथा अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. एन.व्ही. मोहोळकर, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एन. एल. तरवार आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या आण्णाभाऊ साठे अध्यासनातर्फे आयोजित 'शाहिरी जागर' कार्यक्रमात सादरीकरण करताना शाहीर देवानंद माळी आणि सहकारी.

कोल्हापूर जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुरामुळे शहराला पाणीपुरवठा करणारी महानगरपालिकेची जल शुद्धीकरण यंत्रणा पाण्याखाली जाऊन नादुरुस्त झाली. सभोवती पुराचे पाणीच पाणी असूनही नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. शहरातील ही परिस्थिती लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने महानगरपालिका प्रशासनाच्या सहकार्याने आपल्या जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी पालिकेच्या टँकरसह त्यांनी भाड्याने घेतलेल्या टँकरमधून शहराला पाणीपुरवठा केला. दिवसाला सरासरी दोन ते अडीच लाख लीटर या प्रमाणे सुमारे दहा दिवसांहून अधिक काळ पाणीपुरवठा करण्यात विद्यापीठ प्रशासनाला यश लाभले.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील अनेक महाविद्यालये महापुराच्या पाण्याखाली गेली. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. या महाविद्यालयांच्या नुकसानीची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. विद्यापीठामार्फत मदतनिधी देऊन त्यांना दिलासा देण्याचेही काम केले. सांगलीच्या श्रीमती मथुबाई गरवारे महाविद्यालयातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करताना कुलगुरू व प्र-कुलगुरू.

महापुराच्या पार्श्वभूमीवर
शिवाजी विद्यापीठाच्यावतीने
पंचगंगा घाट परिसरातही स्वच्छता मोहीम
राबविण्यात आली.
यावेळी सुमारे २० टन कचऱ्याचा उठाव
करण्यात आला.
या स्वच्छता मोहिमेत सहभागी
राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक.

शिवाजी विद्यापीठाने
कझनकॅटसॉल प्रा.लि. कंपनी समवेत
सामंजस्य करार केला. यावेळी
प्र-कुलगुरू डॉ. डॉ.टी. शिर्के
यांच्यासमवेत कुलसचिव
डॉ. विलास नांदवडेकर आणि
कंपनीचे पंकज देशपांडे व मकरंद पंडित.
सोबत (डावीकडून)
डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर,
डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. आर. के. कामत,
डॉ. पी. एस. पाटील,
प्रभारी परीक्षा संचालक गजानन पळसे,
डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. एस. भांगे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली
येथे 'फिट इंडिया' मोहिमेचा प्रारंभ केला.
या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण
शिवाजी विद्यापीठात करण्यात आले.
यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे,
प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के,
कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,
डॉ. पी. टी. गायकवाड,
डॉ. आर. व्ही. गुरव,
डॉ. डी. के. गायकवाड
आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या
संख्येने उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र अधिविभाग विस्तारित इमारत, संशोधक विद्यार्थी वसतिगृह आणि 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह अशा तीन नूतन इमारतींचे उद्‌घाटन करण्यात आले. 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृहाच्या उद्‌घाटन प्रसंगी उपस्थितांसमवेत राज्याचे महसूलमंत्री व कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षक आदी.

जागतिक ओझोन दिनानिमित्त विशेष पथनाट्याचे सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे विद्यार्थी.

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना प्रमुख पाहुणे डॉ. रविंद्र जायभाय. व्यासपीठावर (डावीकडून) डॉ. अरुण पाटील, डॉ. सचिन पन्हाळकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. संभाजी शिंदे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्रदान करताना ट्यू सूद कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी. सोबत (डावीकडून) डॉ. डी. के. गायकवाड, परीक्षा संचालक गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अजित थिटे, अनिल साळवी, सुजीत पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. नमिता खोत.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन करताना कोल्हापूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख. समोर उपस्थित विद्यार्थी.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित ग्यान व्याख्यानमालेच्या उद्घाटनसत्रात बोलताना ट्युनिशियाच्या डॉ. राबिया होउयाला.

शिवाजी विद्यापीठातर्फे तृतीय पंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत सहभागी तृतीयपंथी नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनी.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'दलित चळवळ ते आंबेडकरी चळवळ: पँथर राजा ढाले यांचा परिप्रेक्ष्य' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार. शेजारी डॉ. हरिष भालेराव व डॉ. जगन कराडे.

शिवाजी विद्यापीठात दरवर्षीप्रमाणे महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठ परिसर स्वच्छता अभियान अत्यंत उत्साहात राबविण्यात आले. अभियानात सहभागी झालेले विद्यार्थी.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित सौरदूत कार्यशाळेत तयार केलेल्या सौरदिव्यांसह सहभागी विद्यार्थी.

शिवाजी विद्यापीठात विविध फेलोशीपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील.

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालयात बसविण्यात आलेल्या अत्याधुनिक वेब ऑफसेट मशीनच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात आंतरराष्ट्रीय जपानी परीक्षेत लक्षणीय यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींच्या प्रमाणपत्र वितरण समारंभात यशस्वी विद्यार्थिनींसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. मेघा पानसरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि स्नेहल शेट्ये.

शिवाजी विद्यापीठातील एम.एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या उद्घाटन समारंभात बोलताना प्रा. गेरहार्ड फोर्टवेंगेल. व्यासपीठावर (डावीकडून) डॉ. ज्योती जाधव, अश्विनी दाणीगोंड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. ज्ञानेश लिमये, डॉ. अतुल कापडी, डॉ. के. डी. सोनावणे.

शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्र स्पर्धेत सहभागी छायाचित्रांच्या प्रदर्शनातील छायाचित्रे पाहताना विद्यार्थिनी.

शिवाजी विद्यापीठाच्या
कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे
चप्पल लाईन येथे आयोजित
प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी
बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.
शेजारी भूपाल शेट्ये, अरुण सातपुते
व प्रशिक्षक.

शिवाजी विद्यापीठाच्या
बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक
ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ई-पेमेंट
व सायबर घोटाळे या विषयावरील
एक दिवसीय कार्यशाळेत बोलताना
रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई विभागीय
कार्यालयाच्या सहाय्यक महाव्यवस्थापक
अरुंधती सिन्हा.

शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या
गाथेचे निरुपण' या ग्रंथाचे प्रकाशन
ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांच्या
हस्ते करण्यात आले. यावेळी (डावीकडून)
डॉ. राजन गवस, डॉ. मोरे, निरुपणकार मारुती
जाधव-तळाशीकर गुरूजी,
कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे,
प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव
डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रणधीर शिंदे,
डॉ. नंदकुमार मोरे.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त रशियन सोशिओलॉजिकल सोसायटी, साऊथ आफ्रिकन सोशिओलॉजिकल सोसायटी, एशिया क्लायमेंट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया, इंटरनॅशनल सोशिऑलॉजीकल सोसायटी आणि इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटी यांच्या सहकार्याने समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करताना विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिकशास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात. सोबत ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्वेट, ज्येष्ठ विचारवंत डॉ.भारत पाटणकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी.आर.साहू, सामाजिक शास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एस. पाटील.

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेत सहभागींसमवेत संवाद साधताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड आदी.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डेव्हलपमेंट ऑफ ॲक्सेसिबल लायब्ररी फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज या विषयावर विद्यापीठ, महाविद्यालयीन, सार्वजनिक ग्रंथपाल यांच्यासाठी आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना गोव्याच्या सामाजिक कल्याण संचालनालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ताहा हाजिक. व्यासपीठावर (डावीकडून) डॉ. पी.बी. बिलावर, डॉ. नमिता खोत, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, युएसए येथील फुलब्राईट स्कॉलर डॉ. सारा डुव्हल आदी.

पारंपरिक वारकरी भजने, विठुमाऊलीचा गजर अन् त्याला टाळ मृदुंगाची साथ अशा अत्यंत भक्तीमय वातावरणात निघालेल्या ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन झाले. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. ए. एफ. सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना खासदार प्रा. संजय मंडलिक. व्यासपीठावर डॉ. रविंद्र भणगे, प्रा. भारती पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, डॉ. विलास आवारी, डॉ. बाळासाहेब भोसले.

शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत कबीरपंथी भजन सादर करताना आष्टा व दुधगाव येथील भजनी मंडळांचे कलाकार.

महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८ साठीच्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त करणाऱ्या डॉ. मेघा पानसरे आणि किरण गुरव यांचा शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे ग्रंथभेट देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत (डावीकडून) डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील.

कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाच्या आढावा बैठकीत बोलताना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत. सोबत (डावीकडून) पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आमदार ऋतुराज पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव आणि डॉ. आलोक जत्राटकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी (डावीकडून) अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. रत्नाकर पंडित, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

शिवाजी विद्यापीठ व डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ यांच्यात संशोधन व आरोग्य सुविधा यांच्या आदान प्रदानाविषयी झालेल्या सामंजस्य करार प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डीवायपी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल. सोबत (डावीकडून) डॉ. विनिता रानडे, डॉ. व्ही.व्ही. भोसले, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. संजय जाधव आदी.

शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून प्रभारी कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर. शेजारी मावळते प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

सन २०१९-२०२०
५७ वा वार्षिक अहवाल समिती
(डावीकडून बसलेले)
डॉ. पी. एस. पांडव, डॉ. सतीश घाटगे
प्राचार्य पी. आर. शेवाळे, डॉ. जगन कराडे
डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार, डॉ. शोभा काळेबाग
डॉ. (श्रीमती) आर. जी. बारवेकर
(डावीकडून उभा असेलेले)
डॉ. नंदकुमार मोरे, श्री. आर. आय. शेख
डॉ. रणधीर शिंदे, श्रीमती आर. इ. फड

सिंहावलोकन

प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे,
कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. या अहवालात सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाची वाटचाल पथदर्शक चित्र या अहवालात पहायला मिळेल.

आजवरच्या विद्यापीठाच्या वाटचालीत अनेक महनीय व्यक्तींचे व संस्थांचे मार्गदर्शन सहकार्य लाभले आहे. विधायक व रचनात्मक चेहरा कायम जोपासला आहे.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासात राष्ट्रीय स्तरातील संशोधन शिवाजी विद्यापीठाचा एच इंडेक्स ८६ इतका असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे मानांकन देशात उंचावले आहे. शिवाजी विद्यापीठास आय.एस.ओ. ९००१:२०१५ मानांकन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व औद्योगिक संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठ केंद्राच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण व समाजोपयोगी संशोधन व मनुष्यबळ विकास अशा प्रशिक्षण-संशोधन-विकास या तीन घटकांवर भरीव काम होत आहे. विद्यापीठ ॲड-ऑन अभ्यासक्रमही सुरु केला आहे जेणेकरुन विद्यार्थ्यांची रोजगार क्षमती वृध्दी होईल. विज्ञान अधिविभागाबरोबरच सामाजिकशास्त्रे व भाषा विषयांची कामगीरीही स्तुत्य स्वरुपाची आहे. हिंदी विषयात कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरु करणारे शिवाजी विद्यापीठ पहिले आहे. विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान विभागाची अत्यंत चांगली प्रगती सुरु आहे. पदार्थविज्ञान विभागामध्ये भाभा अणू संशोधन केंद्राच्या सहकार्याने इंडीयन इनव्हॉयर्नमेंटल रेडिएशन मॉनिटरिंग नेटवर्क अर्थात 'आयर्मोन' ही सुविधा प्रस्थापित करण्यात आली आहे. अशी सुविधा प्रस्थापित करणारे विद्यापीठ हे राज्यातील पहिले अकृषि विद्यापीठ ठरले आहे.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रात रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुजिव्ह एज्युकेशन कार्यान्वित झाल्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली. तसेच विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या बैठकांचे कामकाज कागदविरहित होण्याच्या दृष्टीने ऑनलाईन सॉफ्टवेअरची यशस्वी चाचणी झाली आहे.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विद्यापीठ सातत्याने सार्वजनिक जीवनात कार्यरत आहे. त्यामध्ये गणेशमुर्ती दान उपक्रम, ध्वनीप्रदुषण पातळी मापन, हवा-आर्द्रता मापन, प्लॅस्टिक मुक्त विद्यापीठ, पंचगंगा प्रदूषण सर्वेक्षण आदी उपक्रमांचा समावेश आहे त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या महापूरस्थितीत विद्यापीठात पूरबाधितांकरिता निवारा कॅम्प उभारुन आपदग्रस्त नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले. याकरिता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील साधारणत: एन.एस.एस. स्वयंसेवकांनी सेवा दिली. पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहिमेसह सर्वेक्षण, समुपदेशनाचे काम केले. सामाजिकदृष्ट्या हे एक महत्वाचे काम होते. शिवाजी विद्यापीठ इतिहास लेखन समितीचे कामकाजही गतीने सुरु असून हे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्यही नजीकच्या काळात पूर्ण होत आहे. याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, संशोधन, क्रीडा इत्यादी या क्षेत्रातून अनेक विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक केला आहे.

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये प्रदान करण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयातून कौशल्य विकास उपक्रम राबविण्यात आले. 'स्कील ऑन व्हील्स' या उपक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गावात जाऊन नागरिकांना युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. सुमारे ४६१२ विद्यार्थ्यांना यातून रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' अर्थात सीबीसीएस पद्धती सर्व पदवी अभ्यासक्रमांना लागू करण्यात येणार आहे. गेल्या वर्षभरात विद्यापीठात अनेक नवे उपक्रम राबविण्यात आले. विद्यापीठाचा कार्यविस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. आणि या वाढत्या कार्यविस्ताराबरोबरच विद्यापीठाचा लौकीकही वाढत आहे. या सर्वाचे प्रतिबिंब या वार्षिक अहवालात पडलेले आपणास दिसते.

विद्यार्थ्यांची आणि संशोधनाची गुणवत्ता वाढवून समाजभिमुख संशोधन करण्यावर विद्यापीठ सतत विचार करत आहे. समाजातील जास्तीत जास्त घटकांना विद्यापीठातील संशोधनाचा फायदा व्हावा, या हेतुने संशोधन होत आहे. विद्यापीठातील विविध अधिविभाग व अभ्यास केंद्रे व संलग्नित महाविद्यालये आणि इतर सर्व सहाय्य करणाऱ्या संघटना या कामात मोलाचे योगदान देत आहेत. विविध क्षेत्रात विद्यार्थी यश प्राप्त करुन विद्यापीठाचा लौकीक वाढवत आहेत.

प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे,
कुलगुरू

अधिष्ठाता मंडळ अध्यक्ष : प्र-कुलगुरू यांचे मनोगत

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू

शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील नाही तर देशातील एक अग्रगण्य विद्यापीठ आहे. शैक्षणिक, संशोधन त्याचबरोबर सामाजिक कार्यात सतत गुणवत्तापूर्णरित्या आघाडीवर असलेले शिवाजी विद्यापीठ अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचा समाजाशी सहसंबंध राखण्यात नेहमीच विद्यापीठ यशस्वी ठरले आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांत विद्यापीठाने नेहमीच आपला लौकिक वृद्धिगंत केला आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, कला, क्रीडा क्षेत्रात सातत्य विद्यापीठाने सांभाळले आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीस विशेष महत्त्व आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आजवरच्या वाटचालीत विद्यापीठाने विविध क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी केली आहे.

२०१९-२० हे वर्ष महापूर व नंतरच्या टप्प्यात कोविड या दोन आपत्तीने जनजीवन विस्कळीत झाले. महापूर व कोरोना याचा मानवी जीवनावर दीर्घकाळ परिणाम व प्रभाव झाला. स्वाभाविक शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. या आकस्मिक उद्‌भवलेल्या परिस्थितीला विद्यापीठ प्रशासन सक्षमपणे सामोरे गेले. महापूर काळामध्ये विद्यापीठाने समाज उपयोगी अनेक कामे केली, अनेकांना मदतीचा हात दिला तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन कार्यपद्धतीचा अतिशय सकारात्मक उपयोग विद्यापीठ अधिविभाग, प्रशासन व महाविद्यालयांनी केला. अध्यापन, संशोधन व कार्यविस्तारात या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले. महत्त्वाची आणि उल्लेखनीय बाब म्हणजे पदवी, पदव्युत्तर परीक्षा नियोजित वेळेत घेण्यात आल्या, या परीक्षांचे निकालही वेळेत लावू शकलो.

कोल्हापूर, सांगली आणि सातारा या पश्चिम महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रांत कोरोनाच्या वैश्विक संकटकाळाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने आपली दातृत्त्वाची व मदतीची परंपरा कायम राखली व कुठेही गरजूंचा हात सोडला नाही ही बाब नक्कीच समाधानकारक आहे. कोरोनाबाधित रूग्णांसाठी प्रशासनाला मोठे सहकार्य केले आहे.

शिवाजी विद्यापीठ लवकरच नॅकच्या मूल्यमापनास सामोरे जात आहे. या संदर्भात IQAC विभागाने विद्यापीठ परिसरातील पायाभूत सुविधांपासून सादरीकरणापर्यंतची उत्तम अशा प्रकारे तयारी केली आहे. उच्च शिक्षणातील या महत्त्वाच्या मूल्यांकनासाठी विद्यापीठ सज्ज आहे.

शिवाजी विद्यापीठात एकूण ३३ पदव्युत्तर अधिविभाग, १४ अध्यासन संशोधन केंद्र आणि १० अध्यासने कार्यरत आहेत. सुमारे अडीच ते तीन लाख विद्यार्थी विविध विद्याशाखांतून पदवी आणि पदव्युत्तर आणि संशोधन स्तरावरील शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर काम करून शिकणारे, शिक्षणापासून वंचित असणारे व प्रत्यक्ष नियमित प्रवाहात येऊ न शकणारे सुमारे २५ हजार विद्यार्थी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातून शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाच्या तीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण विभाग, महाविद्यालये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय संशोधन संस्था, विद्यापीठांशी संलग्नपणे कार्यरत आहेत. त्याचबरोबर विविध महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जाही प्राप्त झाला आहे. तीन जिल्ह्यांमध्ये एकूण ४० मूल्यमापन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

विद्यापीठाच्या विविध विभागातील प्राध्यापक, विद्यापीठाच्या विकास, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील आहेत. प्राध्यापकांचे संशोधन विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच राज्यपातळीवरील विविध संस्था, माध्यमांतून सातत्याने सुरू आहे. शिवाजी विद्यापीठ हे आता आय.एस.ओ. ९००१:२०१५ प्रमाणित आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांतून वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्र, कार्यशाळा, मान्यवर अभ्यासकांची व्याख्याने तसेच इतर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले. क्रिडा विभागानेही विविध स्तरांवरील स्पर्धांमधून सुयश संपादन केले आहे. तद्नंतर झालेल्या कोरोना परिस्थितीमुळे पुढील बरेच कार्यक्रम व कामकाज हे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आले. या कालखंडात अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम विद्यापीठाने राबविले.

मराठी भाषा पंधरवडा दिन व मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने भाषा साहित्य संस्कृती विषयीचे अभिनव उपक्रम राबविले गेले. विद्यापीठातील विविध अध्यासनेही सक्रीयपणे कार्यरत आहेत. विद्यापीठातील प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रांत मौलिक अशी कामगिरी केली आहे. विविध विषयांवर सुमारे ६३ पेटंट विद्यापीठाने आजवर प्राप्त केली आहेत.

मार्च २०२१ मध्ये विद्यापीठ नॅक मूल्यांकनास सामोरे जात आहे. नव्या काळातील शैक्षणिक आव्हाने लक्षात घेऊन विद्यापीठ सक्षमपणे त्यास सामोरे जाईल असा विश्वास वाटतो.

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र–कुलगुरू

वार्षिक अहवाल समिती अध्यक्ष मनोगत

प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. या अहवालात इ.स.२०१९-२०२० या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या घडामोडींचे चित्र पहायला मिळेल.

गेल्या वर्षभरात विद्यापीठात अनेक नवे उपक्रम राबविण्यात आले. तसेच विद्यापीठाने अनेक बहुमान पटकावलेले आहेत व अनेक क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधनकार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासासाठी भारतातील बहुतेक सर्व शिखर संस्थांकडून विद्यापीठास आर्थिक निधी प्राप्त झाला आहे. विद्यापीठाचा कार्यविस्तार दिवसेंदिवस वाढत आहे आणि या वाढत्या कार्यविस्ताराबरोबरच विद्यापीठाचा लौकिकही वाढत आहे. या सर्वाचे प्रतिबिंब या वार्षिक अहवालात पडलेले दिसते.

विद्यार्थ्यांना आणि संशोधनाची गुणवत्ता वाढवून समाजाभिमुख संशोधन करण्यावर विद्यापीठ सतत विचार करत आहे. समाजातील जास्तीत जास्त घटकांना विद्यापीठातील संशोधनाचा फायदा व्हावा, या हेतूने संशोधन होत आहे. विद्यापीठातील विविध अधिविभाग व अभ्यास केंद्रे, संशोधन केंद्र व संलग्नित महाविद्यालयांचे या कामात मोलाचे योगदान देत आहेत. विविध क्षेत्रात विद्यार्थी यश प्राप्त करुन विद्यापीठाचा लौकिक वाढवत आहेत.

यावर्षी महापूर व कोवीडच्या काळात विद्यापीठाने जे समाजभान जपले व समाजातील अनेक घटकांना यथायोग्य मदत केली. याचा सर्वांनाच अभिमान वाटतो.

हा अहवाल सादर करीत असताना विद्यापीठाचे मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख व प्राचार्य यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल त्या सर्वांचे मी नम्रतापूर्वक आभार मानतो.

सेमिनार विभागातील कर्मचाऱ्यांचे सर्व माहिती संकलित करण्याच्या कामी मोलाचे सहकार्य लाभले. वार्षिक अहवाल कमिटीच्या सर्व सदस्यांनी संपादनाच्या कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. मजकुराचा आशय आणि अहवालाच्या मांडणीबाबत वेळोवेळी महत्त्वपूर्ण चर्चा केल्या. या सर्वांचे मार्गदर्शन संपादनाच्या कामी मोलाचे ठरले. अहवालाच्या मुद्रितशोधनाचे काम डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. अहवाल डी.टी.पी. व छपाई काम शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय यांनी अगदी सुरेख व स्वच्छ केलेले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांनी या कामी वेळोवेळी सहाय्य केले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे. हा अहवाल सिद्ध होण्यासाठी संपादन कार्यात सहकार्य लाभलेल्या सर्वांचा मी आभारी आहे.

प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे
प्राचार्य, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर

Estd. 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५७ वा

वार्षिक अहवाल

१ जुलै, २०१९ ते ३० जून, २०२० या कार्यकालावधीमध्ये
शिवाजी विद्यापीठाच्या कार्याची माहिती देणारा हा अहवाल आहे.
सदरचा अहवाल विद्यापीठ अधिष्ठाता मंडळाच्या मार्गदर्शनाखाली
तयार केला असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
मधील कलम १३६ (१) अन्वये अधिसभेस सादर करण्यात येत आहे.

■ वार्षिक अहवाल समिती

१.	**प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे** डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर	**अध्यक्ष**
२.	**डॉ. जगन कराडे** समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
३.	**डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार** राजर्षी शाहू कॉलेज, कोल्हापूर	सदस्य
४.	**डॉ. रणधीर शिंदे** मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
५.	**डॉ. सतीश घाटगे** काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले, ता. पाटण, जि. सातारा	सदस्य
६.	**डॉ. शोभा काळेबाग** महावीर महाविद्यालय, कोल्हापूर	सदस्य
७.	**डॉ. नंदकुमार मोरे** मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
८.	**डॉ. (श्रीमती) आर. जी. बारवेकर** इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
९.	**डॉ. पी. एस. पांडव** उपकुलसचिव	सदस्य-सचिव

■ कार्यालयीन सहयोग

डॉ. पी. एस. पांडव	उपकुलसचिव
श्री. डी. डी. सावगावे	सहा. कुलसचिव
श्री. आर. आय. शेख	अधीक्षक
श्रीमती आर. ई. फड	सहा. अधीक्षक
श्रीमती एम. एम. सुतार-मेस्त्री	कनिष्ठ लेखनिक

■ मुद्रितशोधन

डॉ. नंदकुमार मोरे	प्राध्यापक, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ प्रकाशक

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर	कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ संगणकीय अक्षर जुळवणी व मुद्रण

श्री. भूषण पाटील	अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय

अंतरंग

अ. न.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१.	विद्यापीठाचे पदाधिकारी	४
२.	विद्यापीठाचे अधिकारी	३
३.	विद्यापीठ अधिसभा सदस्य	६
४.	विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य	१२
५.	विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य	१४
६.	महत्त्वपूर्ण कार्यक्रम	१९
७.	व्याख्यानमाला	२३
८.	दीक्षान्त समारंभ व विद्यापीठ वर्धापन दिन	२६
९.	शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती	२७
१०.	शिष्यवृत्ती अनुदान	३०
११.	प्रशासकीय विभागांचा अहवाल	३३
१२.	विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा	५२
१३.	क्रीडा मंडळ व संवर्धन मंडळ	५८
१४.	विद्यापीठ विद्यार्थी मंडळे, उपक्रम व युवा महोत्सव	७३
१५.	विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र	७९
१६.	निवडणुका व नियुक्त्या/ अभ्यासमंडळे	८०
१७.	विद्यापीठ अधिविभाग, अध्यासन व संशोधन केंद्रे	९५
१८.	राष्ट्रीय सेवा योजना	१५७
१९.	बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र	१६२
२०.	विद्यापीठ वित्त व्यवस्था	१६८
२१.	विद्यापीठाचे उद्योगधंद्याशी संबंधित उपक्रम	१६९
२२.	केंद्र /महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या सवलती / शिष्यवृत्ती	१७१
२३.	दीक्षान्त समारंभामध्ये प्रदान करण्यात आलेल्या पदवी, पदविका आणि प्रमाणपत्रे	१७२
२४.	प्रवास अनुदान प्राप्त शिक्षकांची माहिती	१७७
२५.	दूरशिक्षण विभाग	१७८
२६.	ऑक्टो./नोव्हें. २०१८ व मार्च/एप्रिल २०१९ परीक्षेस बसलेले विद्यार्थी	१८२
२७.	मार्च/एप्रिल २०१९ परीक्षामधील गुणानुक्रमे विद्यार्थी	१८३
२८.	पारितोषिके, पदके व शिष्यवृत्त्या	१९१
२९.	शिवाजी युनिव्हर्सिटी सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि.	१९५
३०.	संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था	१९७
३१.	महाविद्यालयांकडून प्राप्त झालेली माहिती	२५०
३२.	शिवाजी विद्यापीठ प्रकाशने	२७३
३३.	विद्यापीठ अनुदान मंडळाकडून संशोधन साहाय्य	२७८
३४.	अहवाल कालावधीमधील एम. फिल., पीएच. डी. नोंदणी झालेल्या व पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची व मान्यताप्राप्त मार्गदर्शकांची माहिती	२८१
३५.	विद्यापीठ अधिविभागातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची जाती-जमाती निहाय माहिती	२९८
३६.	विद्यापीठ कार्यालय दूरध्वनी क्रमांक	३०८

१. विद्यापीठाचे पदाधिकारी

✻ कुलपती	:	**मा. श्री. भगतसिंह कोश्यारी**
✻ कुलगुरू	:	**प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे** (दि.१७/०६/२०२० पर्यंत)
✻ प्रभारी कुलगुरू	:	**प्रा. (डॉ.) एन. आर. करमळकर** (दि.१८/०६/२०२० पासून)
✻ प्र- कुलगुरू	:	**प्रा. (डॉ) डी. टी. शिर्के** (दि.१७/०६/२०२० पर्यंत)
✻ कुलसचिव	:	**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
✻ अधिष्ठाता	:	**प्रा. डॉ. पी. एस. पाटील** प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा **प्रा. डॉ. ए. एम. गुरव** प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा **प्रा. डॉ. (श्रीमती) भारती पाटील** प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा **प्रा. डॉ. पी. डी. राऊत** प्रभारी अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
✻ प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ	:	श्री. जी. आर. पळसे
✻ वित्त व लेखा अधिकारी	:	श्री व्ही. टी. पाटील
✻ प्रभारी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ	:	प्रा. (डॉ.) आर. के. कामत
✻ प्रभारी संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार	:	डॉ. (श्रीमती) एस. के. बुवा
✻ संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र	:	डॉ (श्रीमती) एन. बी. खोत
✻ संचालक, विद्यार्थी विकास	:	डॉ. आर. व्ही. गुरव
✻ प्रभारी संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण	:	डॉ. पी. टी. गायकवाड
✻ संचालक, राष्ट्रीय सेवा योजना	:	श्री. ए. डी. जायभाये

२. विद्यापीठाचे अधिकारी

उपकुलसचिव

१. डॉ. जी. एस. कुलकर्णी
२. डॉ. व्ही. एन. शिंदे
३. डॉ. एन. पी. सोनजे (धारणाअधिकारावर)
४. श्रीमती व्ही. एल. अंत्रेडी
५. श्री. एस. एम. कुबल
६. श्री. जी. एस. जाधव
७. डॉ. एन. जे. बनसोडे
८. डॉ. पी. एस. पांडव
९. श्री. जी. आर. पळसे
१०. श्री. व्ही. एस. सोयम
११. श्री. एम. पी. कदम
१२. श्रीमती एस. एस. आडसुळे
१३. श्री. एन. एम. आकुलवार
१४. डॉ. व्ही. जे. ढेरे
१५. श्रीमती बी. एम. नाळे
१६. श्री. आर. वाय. लिधडे (प्रतिनियुक्तीवर)

* **विद्यापीठ कायदा अधिकारी : ॲड. (श्रीमती) ए. ए. कदम**
* **अंतर्गत हिशोब तपासणीस : श्री. ए. बी. चौगुले**
* **मुख्य लेखापाल : श्री. पी. बी. पेटकर (प्रतिनियुक्तीवर)**
* **जनसंपर्क अधिकारी : डॉ. ए. एन. जत्राटकर**

सहाय्यक कुलसचिव

१. श्री. एन. एस. माने
२. श्री. डी. डी. अडगळे .
३ श्री बी. एन. वाघमोडे
४. डॉ. यु. के. सकट
५. श्री. ए. जे. काटकर
६ श्री. टी. के. कुंडले
७. श्री. डी. डी. कवाळे
८. श्री. डी. डी. सावगावे
९. श्रीमती टी. एस. भुतकर
१०. श्री. आर. एस. नागलबोने
११. श्री. एस. एस. खराडे
१२. डॉ. पी. बी. जाखले

* **प्रभारी संचालक, संगणक केंद्र : श्रीमती एस. एस. खराडे**
* **सिस्टीम प्रोग्रॅमर, इंटरनेट युनिट : डॉ. एम. जे. जोशी**
* **नेटवर्क ॲडमिनीस्ट्रेटर : श्री. के. एस. देवरूखकर**
* **सिस्टीम प्रोग्रॅमर : श्री. एस. डी. हुक्केरी**
* **सिस्टीम प्रोग्रॅमर : श्री. ए. व्ही. घाटे**
* **उप अभियंता (विद्युत) : श्री. ए. सी. कांबळे**
* **वैद्यकीय अधिकारी : डॉ (श्रीमती) व्ही. ए. रानडे**
* **सांख्यिकी अधिकारी : श्री. ए. ए. रेडेकर**

■■■

३. विद्यापीठ अधिसभा सदस्य

कुलपती : अध्यक्ष

श्री.चेन्नमनेनी विद्यासागर राव
मा. राज्यपाल तथा कुलपती,
शिवाजी विद्यापीठ,
राजभवन, वाळकेश्वर रोड,
मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.
(दिनांक ०४/०९/२०१९ पर्यंत)

श्री. भगतसिंह कोश्यारी
मा. राज्यपाल तथा कुलपती,
शिवाजी विद्यापीठ,
राजभवन, वाळकेश्वर रोड,
मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.
(दिनांक ०५/०९/२०१९ पासून)

कुलगुरू

२. **प्रा. डॉ. देवानंद शिंदे**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

प्रा. डॉ. नितीन करमळकर
प्रभारी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १८/०६/२०२० पासून)

प्र - कुलगुरू

३. **प्रा. डॉ. डी. टी. शिर्के**
प्र - कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

विद्याशाखांचे अधिष्ठाता

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

४. **प्रा. डॉ. पी. एस. पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

५. **प्रा. डॉ. ए. एम. गुरव**
प्रभारी अधिष्ठाता,
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

मानव विज्ञान विद्याशाखा

६. **डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

७. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक १७/०६/२०२० पर्यंत)

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

८. **श्री. एम. ए. काकडे**
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.
(दि.२२/०७/२०१९ पर्यंत)

श्री. जी. आर. पळसे
प्रभारी संचालक,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
(दिनांक २३/०७/२०१९ पासून)

वित्त व लेखा अधिकारी

९. **श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखाधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संचालक, विद्यापीठ उपपरिसर

१०. ---

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

११. डॉ. आर. के. कामत

प्रभारी संचालक,
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालकापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती

१२. संचालक,

शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे - ४११००१.

संचालक, तंत्र शिक्षण

किंवा

त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालकांपेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती :

१३. संचालक, तंत्र शिक्षण,

पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३,
महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल बिल्डींग,
मुंबई - ४०० ००१.

संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र

१४. डॉ. श्रीमती नमिता बी. खोत

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, विद्यार्थी विकास मंडळ

१५. डॉ. आर. व्ही. गुरव

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

१६. डॉ. पी. टी. गायकवाड

प्रभारी संचालक,
क्रिडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ

१७. डॉ. श्रीमती एस. के. बुवा

आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य

खुला (पाच)

१८. प्राचार्य डॉ. प्रवीण नारायण चौगुले

डी. आर. माने महाविद्यालय,
कागल, जि.कोल्हापूर

१९. प्राचार्य डॉ. सुरेश शंकरराव गवळी

यशवंतराव चव्हाण कॉलेज, (के.एम.सी.)
कोल्हापूर.
(दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत)

प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर

एस. बी. खाडे महाविद्यालय,
कोपार्डे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर
(दिनांक ०९/०३/२०२० पासून)

२०. प्राचार्य डॉ. लालासाहेब गणपती जाधव

वेणूताई चव्हाण कॉलेज,
विद्यानगर, कराड, जि.सातारा

२१. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे

भारती विद्यापीठाचे पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगली - ४१६ ४१६.

२२. प्राचार्य डॉ. मोहन मार्तंड राजमाने

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड, जि.सातारा

प्राचार्य

महिला (एक)

२३. प्राचार्या डॉ. श्रीमती भाग्यश्री महादेव जाधव

सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर,
ता. कोरेगाव, जि. सातारा

प्राचार्य
अनुसूचित जाती (एक)
२४. प्राचार्य डॉ. आर. बी. बनसोडे
बाबा नाईक महाविद्यालय,
कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली.
(दिनांक २६/०९/२०१९ पासून)

प्राचार्य
अनुसूचित जमाती (एक)
२५. रिक्त

प्राचार्य :
निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (एक)
२६. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर तुकाराम कारंडे
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि.सांगली.

प्राचार्य
इतर मागासवर्गीय : (एक)
२७. प्रा. डॉ. रमेश राजाराम कुंभार
दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

व्यवस्थापन प्रतिनिधी (सहा)
खुला (चार)
२८. श्री. सतिश शंकरराव घाळी
संचालक, विद्या प्रसारक मंडळ,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

२९. श्री. प्रताप यशवंतराव माने
सचिव, दि कागल एज्युकेशन सोसायटी,
कागल, जि.कोल्हापूर

३०. ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील
सह सचिव, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी,
एस.डी.पाटील नगर, उरुण-इस्लामपूर,
ता.वाळवा, जि. सांगली - ४१५ ४०९

३१. श्री. प्रताप बाजीराव पाटील
सचिव, श्री. वारणा शिक्षण संस्था,
ऐतवडे खुर्द,
ता. वाळवा, जि. सांगली.

व्यवस्थापन प्रतिनिधी
महिला (एक)
३२. श्रीमती शुभांगी मुरलीधर गावडे
श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, 'ई' वार्ड, ताराबाई पार्क,
कोल्हापूर

व्यवस्थापन प्रतिनिधी
अनुसूचित जाती (एक)
३३. श्री. राजुबाबा जयवंतराव आवळे
२१/२३९, स्टेशन रोड, ङ्गआवळे बिल्डींगफ गंगानगर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष व सचिव
अध्यक्ष
३४. रिक्त

सचिव
३५. रिक्त

अध्यापक : खुला (पाच)
३६. श्री. अशोककुमार बापूराव पाटील
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि. सांगली

३७. डॉ. अरुण आण्णासाहेब पाटील
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर

३८. डॉ. मनोज दशरथ गुजर
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर, ता.कोरेगाव, जि.सातारा

३९. डॉ. सतिश रामचंद्र घाटगे
२, राजश्री अपार्टमेंट, २२८,
मंगळवार पेठ, जोतिबा मंदिराच्या मागे,
कराड, जि. सातारा - ४१५११०

४०. श्री. शिवाजी अनंत पाटील
जनार्दन रेसिडेन्सी, बनवडी कॉर्नर,
विद्यानगर, कराड, जि. सातारा

अध्यापक : महिला (एक)
४१. डॉ. श्रीमती इला देवचंद जोगी
'आशा-दीप', बी-३७, रूक्मिनीनगर-२,
कराड, जि.सातारा - ४१५११०

अध्यापक
अनुसूचित जाती (एक)
४२. डॉ. निलकंठ काशिनाथ खंदारे
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा, जि.सांगली.

अध्यापक :
अनुसूचित जमाती (एक)
४३. डॉ. श्रीमती अलका देविदास निकम
विलिंग्डन कॉलेज,
सांगली

अध्यापक
निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)
किंवा भटक्या जमाती : (एक)
४४. डॉ. राजेंद्र रामचंद्र थोरात
वेणुताई चव्हाण महाविद्यालय,
कराड, जि. सातारा

अध्यापक
इतर मागासवर्गीय : (एक)
४५. श्री. प्रकाश गणपत कुंभार
म. ह. शिंदे महाविद्यालय,
तिसंगी, ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर

विद्यापीठ अध्यापक : (तीन)
खुला (एक)
४६. डॉ. एस. डी. डेळेकर
रसायनशास्त्रअधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ अध्यापक
महिला (एक)
४७. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ अध्यापक
अनुसूचित जाती (एक)
४८. डॉ. एन. बी. गायकवाड
वनस्पतीशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नोंदणीकृत पदवीधर : (दहा)
खुला (पाच)
४९. श्री. संजय पांडुरंग जाधव
प्लॉट नं. ४३, आर.एस.
नं.५९३/१-२,अजिंक्यतारा कॉलनी, कसबा बावडा,
कोल्हापूर

५०. श्री. मल्लाप्पा लग्माण्णा चौगुले
अयोध्यानगर, दुसरी गल्ली,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

५१. श्री. पंकज पदमचंद मेहता
१०/६५, श्रीनाथ अपार्टमेंट्स, धान्य गल्ली, इचलकरंजी,
जि.कोल्हापूर

५२. श्री. मधुकर मुकुंद पाटील
मु. जैताळ, पो. कामडगाव,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

५३. श्री. श्रीनिवास बाळासाहेब गायकवाड
१३३/२, प्लॉट नं. २५, विजय कॉलनी,
गव्हर्नर कॉलनीच्या पूर्वस,
विश्रामबाग, सांगली - ४१६४१६.

नोंदणीकृत पदवीधर
महिला (एक)
५४. श्रीमती आरती प्रभाकर शिंदे
१७४८, 'डी' वॉर्ड, कद्रे गल्ली,
शुक्रवार पेठ, कोल्हापूर

नोंदणीकृत पदवीधर
अनुसूचित जाती (एक)
५५. श्रीमती स्वाती विनोद पंडित
घ.नं. २९२१, 'सी' वॉर्ड, सिद्धार्थ नगर, जुना
बुधवार पेठ, कोल्हापूर - ४१६००२

नोंदणीकृत पदवीधर
अनुसूचित जमाती (एक)
५६. श्री. लोभाजी तातेराव भिसे
मु. पो. हेर्ले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

नोंदणीकृत पदवीधर
निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)
किंवा भटक्या जमाती (एक)
५७. श्री. ए. सी. रजपूत
विसावा धाबा, दत्त कॉलनी,
सांगाव रोड, कागल,
जि. कोल्हापूर ४१६२१६.

नोंदणीकृत पदवीधर
इतर मागासवर्गीय (एक)
५८. श्री. दिनेश गंगाधर जंगम
८, गिरिदर्शन कॉलनी, विलासपूर,
सातारा - ४१५००४

मा. कुलपती नामनिर्देशित : (दहा)
५९. ॲड. जगदिश पाटणे
४६७, गणपती गल्ली,
वाई, जि.सातारा

६०. श्री. संजय परमाणे
सिद्धेश्वर बंगलो, विकास चौक,
इन्कम टॅक्स ऑफिसजवळ,
शिवाजी नगर दक्षिण,
सांगली - ४१६४१६

६१. श्री. नंदकुमार दिवटे
७६१/२०, 'ए' वॉर्ड, 'यशोधन',
न्यू मोरे कॉलनी,
संभाजीनगर बस स्टँडसमोर, कोल्हापूर

६२. श्री. अजितकुमार बी. पाटील
'रत्नत्रय', १३३०A/९A, सागरमाळ, प्रतिभानगर रोड,
कोल्हापूर - ४१६००८

६३. श्रीमती नसिमा हुरजूक
२३३/६, 'इ' वॉर्ड, आत्माराम अपार्टमेंट, जनरल थोरात
मार्ग, हिंदनगर सोसायटीसमोर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर - ४१६००३.

६४. श्री. एस. जी. कुलकर्णी
'राधेय' ६४८/४७, 'बी' वॉर्ड,
मंडलिक वसाहत, मंगळवार पेठ,
कोल्हापूर - ४१६०१२.

६५. रिक्त

६६. डॉ. शरद काळे
बी २०/०/२, सेक्टर ११,
केंद्रीय विहार, खारघर, नवी मुंबई - ४१०२०१

६७. श्री. प्रताप चिपळूणकर
७४३, तिसरी गल्ली, शाहूपुरी,
सुभाष फोटो स्टुडीओसमोर,
कोल्हापूर

६८. श्री. अनिल ज्ञानदेव चौगुले
२८२३/४८, 'बी' वॉर्ड,
महालक्ष्मी नगर, कोल्हापूर

कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले विद्यापीठ अध्यापकेतर
कर्मचारी, संलग्नीत महाविद्यालयीन अध्यापकेतर कर्मचारी : दोन
६९. श्री. राम बाजीराव तुपे
आस्थापना-२ विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

७०. श्री. महेश बाबुराव निलजे
श्री.विजयसिंह यादव आर्ट्स अँड सायन्स कॉलेज,
पेठ वडगाव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

विधान सभा अध्यक्ष यांनी नामनिर्देशन केलेले विधान सभा सदस्य (दोन)

७१. श्री. अमल महाडिक
'सुस्वयम' शिरोली (पुलाची),
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
(दिनांक २४/१०/२०१९ पर्यंत)

७२. श्री. चंद्रदिप नरके
'चंद्रदिप' ११८७, 'ए' वॉर्ड,
शिवाजी पेठ, कोल्हापूर
(दिनांक २४/१०/२०१९ पर्यंत)

७३. विधान परिषद सभापती यांनी नामनिर्देशित केलेला विधान परिषदेचा सदस्य (एक)

श्री. दत्तात्रय अच्च्युतराव सावंत
मु./पो. अंबे,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

कुलगुरू नामनिर्देशित नगरपरिषद किंवा महानगरपालिका सदस्य (एक)

७४. रिक्त

जिल्हा परिषद शिक्षण समितीने नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी : (एक)

७५. रिक्त

कुलसचिव : सदस्य सचिव

७६. डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.

■■■

४. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य

कुलगुरू : अध्यक्ष

१. **प्रा. डॉ. देवानंद शिंदे**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. १७ जून, २०२० पर्यंत)

प्रा. डॉ. नितीन करमळकर
प्रभारी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१८ जून, २०२० पासून)

प्र – कुलगुरू

२. **प्रा. डॉ. डी. टी. शिर्के**
प्र–कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

मा. कुलपती नामनिर्देशित (एक)

३. **श्री.अमित कुलकर्णी**
श्रीनिधी, वरद विनायक हौसिंग
सोसायटी, गेंडामाळ जकात नाका चौक,
शाहूपुरी, सातारा – ४१५ ००१.

कुलगुरू नामनिर्देशित अधिष्ठाते (दोन)

४. **प्रा. डॉ. पी. एस. पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

५. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. १७ जून, २०२० पर्यंत)

कुलगुरू नामनिर्देशित विद्यापीठ विभाग प्रमुख किंवा विद्यापीठ परिसंस्था यांचे प्रमुख किंवा संचालक (एक)

६. **डॉ. ए. एम. सरवदे**
इंग्रजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. २९/०२/२०२० पर्यंत)

प्राचार्य (अधिसभेतून) (दोन)

७. **प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे**
भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगली – ४१६४१६.

८. **प्राचार्य डॉ. चंद्रशेखर तुकाराम कारंडे**
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि.सांगली.

अध्यापक (अधिसभेतून) (दोन)

९. **डॉ. एन. बी. गायकवाड**
वनस्पतीशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१०. **श्री. प्रकाश गणपत कुंभार**
म. ह. शिंदे महाविद्यालय,
तिसंगी,
ता. गगनबावडा, जि.कोल्हापूर

व्यवस्थापन प्रतिनिधी (अधिसभेतून) (दोन)

११. **ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील**
सह सचिव, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी,
एस.डी.पाटील नगर, उरुण – इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली – ४१५ ४०९

१२. **श्री. राजुबाबा जयवंतराव आवळे**
२१/२३९, स्टेशन रोड,
'आवळे बिल्डींग' गंगानगर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

नोंदणीकृत पदवीधर (अधिसभेतून) (दोन)

१३. श्री. संजय पांडुरंग जाधव
प्लॉट नं. ४३, आर.एस. नं.५९३/१-२,
अजिंक्यतारा कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर

१४. श्री. लोभाजी तातेराव भिसे
मु./पो.-हेर्ले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

विद्यापरिषदेतून : (दोन)

१५. डॉ. रसूल गफूर कोरबू
आरएसएन: १४/३/१, प्लॉट नं. ३,
जुना नाकाजवळ, शिवराय कॉलनी,
कसबा बावडा, कोल्हापूर-४१६ ००६

१६. डॉ.श्रीमती भारती तुकाराम पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरू नामनिर्देशित (एक)

१७. प्रा. डॉ. विवेक खानझोडे
नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग
(NITIE), विहार लेक,
पोवई, मुंबई - ४०००८७

सचिव, उच्च शिक्षण, किंवा त्याने नामनिर्देशन केलेली उपसचिव किंवा सह संचालक, उच्च शिक्षण या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती

१८. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई -४०० ०३२.

संचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालक उच्च शिक्षण या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती

१९. संचालक,
शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे.

संचालक, तंत्र शिक्षण
किंवा
त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालक तंत्र शिक्षण या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशी व्यक्ती

२०. संचालक, तंत्र शिक्षण,
पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३,
महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल
बिल्डींग,
मुंबई - ४०० ००१.

कुलसचिव : सदस्य सचिव

२१. डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

निमंत्रित
वित्त व लेखा अधिकारी

२२. श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

निमंत्रित
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

२३. श्री. एम. ए. काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक २२/०७/२०१९ पर्यंत)

श्री. जी. आर. पळसे
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दिनांक २३/०७/२०१९ पासून)

२४. **निमंत्रित**
विद्यार्थी परिषद अध्यक्ष
रिक्त

■■■

५. विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य

कुलगुरू : अध्यक्ष

१. **प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

प्रा. डॉ. नितीन करमळकर
प्रभारी कुलगुरू ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१८ जून, २०२० पासून)

प्र–कुलगुरु

२. **प्रा. डॉ. डी. टी. शिर्के**
प्र - कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

विद्याशाखांचे अधिष्ठाता

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

३. **प्रा. डॉ. पी. एस. पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

४. **प्रा. डॉ. ए. एम. गुरव**
प्रभारी अधिष्ठाता,
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

मानव विज्ञान विद्याशाखा

५. **डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.१७ जून, २०२० पर्यंत)

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

६. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. १७ जून, २०२० पर्यंत)

संचालक, उपपरिसर

७. ---

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

८. **डॉ. आर. के. कामत**
प्रभारी संचालक,
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरू नामनिर्देशित प्राचार्य (आठ)

९. **प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर**
विवेकानंद महाविद्यालय,
कोल्हापूर

१०. **प्राचार्य डॉ. युवराज बंडू गोंडे**
शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
वाघोली, जि.सातारा

११. **प्राचार्य डॉ. यु. आर. माने–पाटील**
एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय,
मिरज, जि. सांगली

१२. **प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले**
दत्ताजीराव कदम टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग
इन्स्टिट्यूट,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

१३. **प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील**
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲण्ड
सायन्स कॉलेज,
चिखली, ता.शिराळा, जि.सांगली

१४. प्राचार्या डॉ. श्रीमती मेघा गुळवणी
मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
विटा, जि.सांगली

१५. प्राचार्या डॉ. श्रीमती प्रतिभा गायकवाड
धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा

१६. प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे
राजर्षि छत्रपती शाहू महाविद्यालय,
कदमवाडी रोड, कोल्हापूर

कुलगुरू नामनिर्देशित
विद्यापीठ अध्यापक (दोन)
१७. डॉ. श्रीमती जे. पी. जाधव
जैवतंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१८. रिक्त

कुलगुरू नामनिर्देशित
मान्यता प्राप्त परिसंस्थेचा प्रमुख (एक)
१९. रिक्त

विद्याशाखेचे प्रतिनिधी
दोन अध्यापक
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
खुला
२०. डॉ. दिलीप हणुमंत दगडे
रसायनशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अनुसूचित जाती
२१. डॉ. प्रमोद निवृत्ती वासंबेकर
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
खुला
२२. डॉ. रसूल गफूर कोरबू
आरएसएन - १४/३/१, प्लॉट नं.३, जुना
नाकाजवळ, शिवराय कॉलनी, कसबा बावडा,
कोल्हापूर

अनुसूचित जमाती
२३. रिक्त

मानव विज्ञान विद्याशाखा
खुला
२४. डॉ. सुनील रघुनाथ सावंत
किसनवीर महाविद्यालय,
वाई, जि.सातारा

निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती :
महिला :
२५. डॉ. श्रीमती शर्मिला अशोक साबळे
राजर्षि शाहू आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, रूकडी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
खुला
२६. डॉ. श्रीमती प्रतिभा सुभाषचंद्र पाटणकर
शिक्षणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इतर मागासवर्गीय
२७. रिक्त

अधिसभा नामनिर्देशित
एक व्यवस्थापन प्रतिनिधी
२८. श्री. प्रताप यशवंतराव माने
सचिव, दि कागल एज्युकेशन सोसायटी,
कागल, जि.कोल्हापूर

कुलपती नामनिर्देशित
मान्यवर तज्ञ (आठ)
२९. प्रा. रघुराम राव
संचालक, नॅशनल इन्सिटट्यूट ऑफ फार्मास्युटीकल
एज्युकेशन अँड रिसर्च (NIPER), सेक्टर-६७,
फेज - १०, एस.ए.एस. नगर,
मोहाली - १६० ०६२, पंजाब.

३०. प्रा. के. एन. गणेश
संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन
अँड रिसर्च (IISER), मेन बिल्डींग, पाषाण,
पुणे-४११ ००८.

३१. डॉ. अनिल कौल
संचालक, इन्स्टिट्यूट ऑफ मायक्रोबायल टेक्नॉलॉजी
कॉन्सिल ऑफ साईटीफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च
(GOI), सेक्टर-३९, चंदिगढ-१६० ०३६.

३२. डॉ. लक्ष्मी नारायण
प्रोजेक्ट डायरेक्टर,
एस्त्रो सॅटेलाईट सेंटर (ISAC),
जुने विमानतळ रोड, विमानपुरा पोस्ट,
बेंगलुरू - ५६००१७, कर्नाटक

३३. सीएस मकरंद लेले
कंपनी सचिव,
एम.आर.एम. असोसिएट्स,
पहिला मजला, ज्ञानसुधा अपार्टमेंट्स, ७७, विजयनगर
कॉलनी, २१४७, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.

३४. श्री. अशोक गिरी
प्रिन्सिपल सायंटीस्ट,
CSIR - नॅशनल केमिकल लॅबोरेटरी,
(Council of Sccience & Industrial Research)
पुणे - ४११ ००८.

३५. श्री. अदिले सुमरिवाला
अध्यक्ष,
ॲथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया,
WG११४G, पहिला मजला,
तोडा पूर विलेज, तोडा पूर मुख्य रस्ता,
डी. पी. शास्त्री मार्ग,
नवी दिल्ली-११००१२.

३६. रिक्त

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशी,
त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती
३७. संचालक,
शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे.

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती
३८. संचालक, तंत्रशिक्षण
पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३, महापालिका मार्ग,
एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल बिल्डिंग,
मुंबई-४०० ००१.

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
३९. श्री. एम. ए. काकडे
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.
(दि.२२/०७/२०१९ पर्यंत)

श्री. जी. आर. पळसे
प्रभारी संचालक,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.
(दि.२३/०७/२०१९ पासून)

अभ्यास मंडळांचे अध्यक्ष
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
अध्यक्ष, गणित अभ्यास मंडळ
४०. प्रा. डॉ. श्रीमती एस. एच. ठकार
गणित अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, संख्याशास्त्र अभ्यास मंडळ
४१. डॉ. श्रीमती एच. व्ही. कुलकर्णी
संख्याशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
(दि.२०/०९/२०१९ पासून)

अध्यक्ष, पदार्थ विज्ञान अभ्यास मंडळ
४२. प्रा. डॉ. पी. एस. पाटील
पदार्थ विज्ञान अधिविभाग,
सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षातील मुलांचे वसतिगृहातील १, २ व ३ ची माहिती खालीलप्रमाणे.

विद्यापीठ परिसरमध्ये मुलांसाठी तीन वसतिगृहे आहेत. सदर वसतिगृहामध्ये पदव्यूत्तर विभागातील एम. ए, एम एस्सी, एम. कॉम, एम. बी. ए, एम टेक, एम फिल, आणि पीएच. डी. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केली जाते..

शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये वसतिगृह क्र १, २, ३ मध्ये एकून ६५१ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. त्याच बरोबर अन्य विद्यापीठातून आलेल्या संशोधनार्थ, उजळणी व चर्चा सत्रासाठी आलेले प्राध्यापकांशिवाय बहि:स्थ परिक्षा किंवा विद्यापीठाच्या अन्य कामाकरीता आलेल्या काही विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय वसतिगृहामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार करण्यात आली होती. सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षातील मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता खालील सोयी सुविधा पुरविल्या गेल्या होत्या.

१. विद्यार्थ्यांना मनोरंजानासाठी टी. व्ही.तसेच वाचनासाठी वर्तमानपत्रे यांची सोय केली आहे.

२. जनरेटर, सोलर वॉटर हिटर सिस्टीम विद्यार्थ्यांना स्वच्छ, जंतु विरहित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी Water Purifier RO बसविला आहे. तसेच सर्व खोल्यामध्ये पंखे (फॅन) टयुबलाईट, मोबाईल चार्जसाठी स्वीच इ. सोयी पुरवल्या जातात.

३. वसतिगृह परिसरामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सिमेंटची बाके बसविण्यात आली आहेत.

४. मर्क्यूरी हॅलोजन लॅप वसतिगृह परिसरात बसविण्यात आले आहेत

५. वसतिगृहाभोवती दगडी कंम्पाउड घातले आहे.

६. इंटरनेट सुविधा ५ कॉम्प्युटर, २० लॅपटॉप इंटरनेट कनेक्शन, सोबत वसतिगृह परिसर मध्ये मोफत wi-fi ची सुविधा पुरविणेंत येते

७. वसतिगृह परिसरामध्ये व्ययामकरीता सिंगलबार डबलबार बसविण्यात आले आहेत.

८. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यानासाठी अत्याधुनिक ओपन जिमची सुविधा केली आहे.

९. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिकेट, कॅरम बोर्ड, हॉलीबॉल इत्यादी साहित्य दिले जाते.

१०. वसतिगृह क्र. २ व ३ च्या मेसच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी १३ रूम बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे ५२ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली आहे

११. वसतिगृह क्र. २ व ३ च्या मेसच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची सोय केली आहे.

१२. विद्यार्थी वसतिगृहातील सर्व मेस 'ना नफा ना तोटा' या तत्वावर विद्यार्थी विद्यार्थ्यांच्यासाठी क्लब मेस पध्दतीने चालविल्या जातात.

१३. वसतिगृह क्र.१, २ व ३ कडील मेसचे नूतनीकरण केले आहे.

१४. १२० संशोधक विद्यार्थ्यांना रूसा कार्यक्रमाअंतर्गत नवीन वसतिगृह बाधंण्यात आले आहे. तसेच त्याच वसतिगृहास नवीन अत्याधुनिक मेस बाधंण्यात आले आहे.

१५. मुलांचे वसतिगृह क्र. ३ समोरील जागेमध्ये नवीन लॉन तयार करण्यात आले आहे.

अ. नं.	नांव	पदनाम
१.	**प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर**	**चिफ रेक्टर**
२.	**श्री. जी. जे. साळुंखे**	**रेक्टर**
३.	**डॉ. एस. पी. पंचगल्ले**	**रेक्टर**
४.	**डॉ. एन. एल. तरवाल**	**रेक्टर**

पूरग्रस्त मदत शिबीर

दिनांक : ६ ऑगस्ट २०१९ ते १३ ऑगस्ट २०१९

कोल्हापूर जिल्हामध्ये दि. १ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट २०१९ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे महाभयानक महापूर येऊन सर्वत्र जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले होते.या सर्व पुरपरस्थितीतील अडीअडणीमध्ये शिवाजी विद्यापीठाने पूरग्रस्त व पूरामुळे बांधित लोकाना राहण्याची, जेवणाची, व प्राथमिक औषधोपचाराची सोय ही मुलांचे वसतिगृह व आप्पासाहेब पवार विद्यार्थीभवन याठिकाणी केली होती. जवळपास ३०० पेक्षा जास्त पुरग्रस्त लोकाची सोय केली होती. त्यामध्ये १२ महिला व ५-७ लहान मुलांचा देखील समावेश होता.

या दरम्यान शिवाजी विद्यापीठाचे आदरणीय मा. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे ऑफिस कामासाठी मुंबईला गेले होते.व परतीच्या प्रवासा दरम्यान ते कराडमध्ये स्वता: महापुरामुळे अडकून होते.परंतु त्यांने दिलेल्या निर्देशानुसार कोल्हापूरातील पुरपरिस्थितीच्या अंदाज घेऊन पुरग्रस्त मदत शिबीर करण्याच्या व त्याचबरोबर विद्यापीठामधील मुलांचे व मुलीचे वसतिगृहामध्ये राहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची सदर महापूर काळातील अडीअडचणी वरती मात करण्याच्या अनुषंगाने, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या मार्गदर्शनुसार व विद्यार्थी वसतिगृहाचे मुख्य अधिक्षक डॉ. एस. डी. डेळेकर, रेक्टर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अथक प्रयत्नातून व नियोजनातून सर्व पूरग्रस्ताची या शिबीर काळात अतिशय चांगल्या जेवण्याची, राहण्याची व प्राथमिक औषधोपचाराची सोय करण्यात आली होती.

कोविड १९ विषाणूच्या अनुशगांने प्रादुर्भाव वाढत होता. त्या अनुषगांने आत्पकालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. जिल्हादंडाधिकारी सभा, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या आदेशान्वये उपविभागीय दंडाधिकारी,करवीर विभाग, कोल्हापूर यांच्या दि.१७/०४/२०२० च्या पत्रानुसार कोरोना बाधीत रूग्रांच्या विलिगीकरणासाठी व उपचारासाठी शिवाजी विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्र.१,२,३ येथे भोजन कक्षासहीत अधिग्रहीत करण्याचे आदेश देण्यात आले होते. मुलांच्या वसतिगृहामधील खोल्यामधील सर्व साहित्य काढताना व्हिडिओ शुटींगच्या निरीक्षणाखाली कुलूप उघडून विद्यार्थ्यांचे सर्व साहित्य काढून ट्रंकमध्ये व्यवस्थित ठेवून व त्या साहित्याचे नोंदी ठेवली. कोविड १९ त्या काळामध्ये विद्यापीठ प्रशासनाने निवास व भोजन समिती स्थापन करून अधिकारी व कर्मचारी यांना काम नेमून योग्य ती कार्यवाही केली.

तसेच विद्यार्थ्यांच्या सतत होणाऱ्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना सामाईक भाग २ परीक्षेसाठी तसेच काही विद्यार्थ्यांना नोकरीसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशानुसार कोरोना विषाणूचा संसर्गाचे प्रतिबंधात्मक उपाययोजना करून विद्यार्थ्यांचे साहित्य सुरक्षितरीत्या देण्यात आले.

वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांकरिता विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते.

मुलांचे वसतिगृहामध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमांची यादी सन २०१९-२०२०

अ. क्र	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थित
१	२५/०७/२०१९	वृक्षारोपन	प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अधिष्ठाता प्रा. पी. डी. राऊत, IIF, Kolhapur, chapter अध्यक्ष श्री. सुमित चौगले, व HDFC बँक सर्कल हेड श्री. मधू कासावाझुल्ला, उपकुलसविच डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच वसतिगृहाचे मुख्य रेक्टर डॉ. एस. डी. डेळेकर, रेक्टर डॉ. एस. पी. पंचगल्ले, डॉ. एन. एल. तरवाळ, कर्मचारी व विद्यार्थी वर्ग यांच्या उपस्थित राबविण्यात आला.

११.६ विद्यार्थिनी वसतिगृह

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थिनी वसतिगृहाची वार्षिक माहीती पुढील प्रमाणे

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये विद्यापीठ धोरणानुसार सर्व विद्यापीठ प्रवेशीत विद्यार्थिनीना (इच्छुकांना) प्रवेश देणेत येतो. विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये एकूण तीन वसतिगृहे व तीन मेस उपलब्ध आहेत. दरवर्षी तीन वसतिगृहांमध्ये मिळून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींची संख्या १००० ते ११०० च्या आसपास असते. मात्र सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात १४३६ इतकी आहे. या सर्व विद्यार्थिनींची व्यवस्था विद्यार्थिनी वसतिगृहात करणेत आलेली आहे.

अभ्यासक्रम : M.A, M.COM, M.Sc. MCA Science, MCA Commerce, B.Lib, M.Lib, BJC, MJC, MBA, M.Ed, M.Phil, Ph.D. AGPM, L.L.M., M.S.W., MPSC/UPSC, Mass Communication, ग्रंथालय व माहितीशास्त्र.

वसतिगृहांमध्ये उपलब्ध असणाऱ्या तीन मेस ह्या विद्यार्थिनींमार्फत क्लब सिस्टीम नुसार चालविल्या जातात. अत्यंत वाजवी दरात उत्तम प्रतीचे जेवण दिले जाते. शिवाय पाणी, टिव्ही, डिटीएच, यांच्या २४ तास सुविधांबरोबरच गिझर, सोलर सिस्टीमद्वारे गरम पाणी, व ॲक्वागार्डद्वारे पिण्याचे पाणी, प्रत्येक विंगकरीता स्पिकरची सोय, २४ तास सुरक्षा व्यवस्था, तातडीची वैद्यकीय सेवा, तसेच व्यायामाकरिता जिम, योगा वेंडींग मशीन, Wi-Fi ची सेवा उपलब्ध केल्या आहेत.

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये आयोजित केलेले विविध कार्यक्रम

अ क्र.	दिनांक	कार्यक्रमांचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
१	२७/७/२०१९	प्रथम वर्ष विद्यार्थिनींचे स्वागत व मिटींग	प्रथम वर्ष विद्यार्थिनींना वसतिगृह नियम/मेस व रॅगिंग माहिती व शासन. (डॉ. प्रतिमा पवार चिफ रेक्टर, डॉ. ए. एस. जाधव रेक्टर, डॉ. कविता वडाळे रेक्टर डॉ. वाळवेकर रेक्टर)
२	३०/७/२०१९	द्वितीय वर्ष विद्यार्थिनी मिटींग	द्वितीय वर्ष विद्यार्थिनींना १. वसतिगृह नियमावली २. रॅगिंग माहिती व नियम ३. मेस नियम. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए. एस जाधव. रेक्टर, डॉ. कविता वड्राळे रेक्टर, उपस्थित वॉर्डन व शिपाई.
३	६/८/२०१९	एम.फिल. आणि पीएच. डी. विद्यार्थिनी मिटींग	एम.फिल. आणि पीएच. डी. विद्यार्थिनी मिटींग व प्रवेशाबाबत सुचना तसेच फेलोशीप असणाऱ्या विद्यार्थिनी प्रवेश फी बाबत चर्चा केली. उपस्थिती डॉ. माधुरी वाळवेकर (रेक्टर)

अ क्र.	दिनांक	कार्यक्रमांचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
४	७/८/२०१९	कमवा आणि शिका विद्यार्थिनी मिटींग	प्रथम वर्ष विद्यार्थिनींचे स्वागत, कामाचे नियोजन, मेस संबंधी नियम, रॅगिंग माहिती व शासन याबाबत मार्गदर्शन. डॉ. प्रतिमा पवार चिफ रेक्टर
५	८/८/२०१९	बेसिक हेल्थ प्रोग्राम Health Awareness Programme	निरोगी आरोग्य विषयी मार्गदर्शन रोग व प्रतिबंधात्मक कारवाई. संतुलित आहार या विषयी मार्गदर्शन डॉ. रानडे मॅडम हेल्थ सेंटर, SUK, डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए. एस जाधव. रेक्टर, डॉ. कविता वड्राळे रेक्टर, डॉ. वाळवेकर रेक्टर.
६	७/९/२०१९	स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा	वसतिगृहातील विद्यार्थिनींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.
७	२/१०/२०१९	'स्वच्छता अभियान'	गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान वसतिगृह अंतर्गत सफाई केली गेली. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए. एस. जाधव रेक्टर, डॉ. कविता वडाळे रेक्टर, डॉ. वाळवेकर रेक्टर. उपस्थित नाईट वॉर्डन व शिपाई.
८	६/१०/२०१९	'स्वाधार योजना'	समाजकल्याण अंतर्गत स्वाधार योजना शिष्यवृत्तीबाबत विद्यार्थिनींना माहीती वा मार्गदर्शन. श्री. योगेश दळवी, श्रीमती प्रतिभा सावंत (समाजकल्याण विभाग, कोल्हापूर) डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर)
९	७/१०/२०१९	कव्वाली स्पर्धा	१०० विद्यार्थिनींचे राहण्याचे निवासी व्यवस्था (विविध राज्यातून आलेल्या) कमवा व शिका वसतिगृह
१०	७/१०/२०१९	करिअर गाईडन्स	वसतिगृहातील विद्यार्थिनींना करिअर बाबत मार्गदर्शन – श्री. गुरव व गीतांजली पाटील.
११	११/१०/२०१९	UGC अंतर्गत दिव्यांगाकरीता योजना, माहिती व मार्गदर्शन	वसतिगृहात राहणाऱ्या दिव्यांग विद्यार्थिनींना विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. डॉ प्रतिभा देसाई समन्वयक.
१२	१७/१०/२०१९	'दांडिया'	डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या मनोरंजनासाठी.
१३	२३/१०/२०१९	कोजागिरी पौर्णिमा	वसतिगृहात कोजागिरी पौर्णिमा साजरी करणेत आली. मसाले दुध, फरसाण–चिरमुरे वाटप.
१४	३०/१०/२०१९	महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद. दि. १४ ते १७ नोव्हेंबर	(विविध राज्यातून आलेल्या महिलांकरिता) ३०० महिलांची निवास व्यवस्था.
१५	३०/१२/२०१९	राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि. १५ ते २४ नोव्हेंबर	विविध राज्यातून आलेल्या NSS विद्यार्थिनींकरीता राष्ट्रीय एकात्मता शिबीर ३०० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था.
१६	३०/१२/२०१९	डॉ. आप्पासाहेब पवार पुण्यतिथी	शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू तसेच कमवा व शिका योजनेचे शिल्पकार डॉ. आप्पासाहेब पवार पुण्यतिथी प्रतिमा पूजन व त्यांच्या कार्याबाबत माहिती डॉ. आसावरी जाधव रेक्टर

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
१७	३१/१२/२०१९	नवीन वर्ष स्वागत	२०१८ सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे २०१९ चे स्वागत विद्यार्थिनी वसतिगृहात केले.
१८	३/१/२०२०	सावित्रीबाई फुले जयंती	प्रो. डॉ. आर. डी. बोडरे S. G. M. College, कराड यांनी विद्यार्थिनींना सावित्रीबाईचे विचार व आचार याबाबत मार्गदर्शन डॉ. व्ही. एस. मन्ने डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. वाळवेकर रेक्टर, नाईट वॉर्डन व शिपाई उपस्थित होते.
१९	५/१/२०२०	पर्यावरण जागरूकता अभियान	पंचगंगा प्रदुषणमुक्ती जागर, जन प्रदुषणबाबत माहिती व Documentry फिल्म विद्यार्थिनींना दाखवण्यात आली. श्री. कपिल उल्हास पाटील. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर)
२०	१९/१/२०२०	'अविष्कार योजना'	अविष्कार कार्यशाळेकरीता आलेल्या ५० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था.
२१	२९/१/२०२०	The Art of Living Programme	डॉ. अणिमा दहिभाते– सकारात्मकता ताणतणाव निवारण Medition, Music Therepy याबाबत विद्यार्थिनींनीकरिता कार्यशाळा. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. कविता वड्राळे, रेक्टर
२२	---	---	वर्षभरात येणाऱ्या सर्व NSS विद्यार्थिनींकरिता निवास व्यवस्था वसतिगृहात करण्यात येते.

वसतिगृहामध्ये डॉ. श्रीमती प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. कविता वड्राळे, रेक्टर, डॉ. आसावरी जाधव, रेक्टर, डॉ. वाळवेकर, रेक्टर, तसेच वसतिगृहाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता एक कनिष्ठ सहायक व रोजंदारी लिपिक, १ पेज बेसिस, पाच शिपाई, कायमस्वरूपी व करार पद्धतीवर ३ नाईट वॉर्डन काम करीत आहेत.

हॉस्टेल मधील प्रवेशित मुलींची एकूण संख्या

अ. क्र.	हॉस्टेल क्रमांक	विद्यार्थिनींची संख्या
१	हॉस्टेल क्रमांक – १	३६८
२	हॉस्टेल क्रमांक – २	५६९
३	हॉस्टेल क्रमांक – ३	४९९
	एकूण	**१४३६**

विद्याशाखानिहाय एकूण मुलींची संख्या

अ. क्र.	विद्याशाखानिहाय	विद्यार्थिनींची संख्या
१	विज्ञान	९१६
२	सामाजिक शास्त्रे	४६०
३	भाषा	६०
	एकूण	**१४३६**

११.७ आस्थापना/पेन्शन विभाग

विद्यापीठातील दि. १ जुलै, २०१९ ते ३० जून २०२० अखेर सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक, व मयत सेवकांची माहिती खालीलप्रमाणे.

अ.क्र	नांव	पदनाम	जन्मदिनांक	सेवानिवृत्त दिनांक	शेरा
१	श्रीमती जाधव मिना राजेंद्र	सहायक अधीक्षक	१७-७-१९६१	३१-७-२०१९	
२	श्री अमर शंकराव डाकवे	ग्रंथालय परिचर	१५-८-१९५९	३१-८-२०१९	
३	श्री चौगले उद्धव आनंदराव	सहायक अधीक्षक	१७-८-१९६१	३१-८-२०१९	
४	श्री नितीन पांडुरंग साळोखे	सहायक अधीक्षक	२०-८-१९६१	३१-८-२०१९	
५	श्री साळोखे शिवाजी विनायक	सहायक अधीक्षक	४-८-१९६१	३१-८-२०१९	
६	श्री डावरे विश्वास सखाराम	चौकिदार	२०-८-१९५९	३१-८-२०१९	
७	श्री प्रकाश भैरु वास्कर	हवालदार	८-९-१९५९	३०-९-२०१९	
८	श्री मोरे रवींद्र माधवराव	सहायक अधीक्षक	२७-११-१९६१	३०-११-२०१९	
९	श्री तोरसे प्रकाश बाबुराव	अधिक्षक	१०-११-१९६१	३०-११-२०१९	
१०	श्री चंद्रकांत महादेव शिंदे	प्रयोगशाळा परिचर	१४-१२-१९५९	३१-१२-२०१९	
११	श्री जाधव रावसाहेब शंकर	चौकिदार	२-१२-१९५९	३१-१२-२०१९	
१२	श्री शिरीष आनंदराव गवळी	वरीष्ठ सहायक	९-१-१९६२	३१-१-२०२०	
१३	श्री पांडुरंग रामचंद्र कोळसे	शिपाई	१७-१-१९६०	३१-१-२०२०	
१४	कै.जयवंत हणमंतु इंगळे	क्रीडा प्रशिक्षक	१८-१-१९७०	२९-३-२०२०	
१५	श्री रमेश बाबुराव साळोखे	आरेखक	२२-३-१९६२	३१-३-२०२०	
१६	श्री नारायण मल्लया आकुलवार	उपकुलसचिव	२४-४-१९६२	३०-४-२०२०	
१७	श्री किशोर सदाशिव सुर्यवंशी	सहायक अधीक्षक	१-५-१९६२	३०-४-२०२०	
१८	श्री रमेश वसंत वासुदेव	चौकिदार	१-५-१९६०	३०-४-२०२०	
१९	कै.बिरोबा कन्याप्पा पुजारी	हवालदार	३-४-१९६४	७-५-२०२०	
२०	श्री अशोक दत्तात्रय बुचडे	सहायक अधीक्षक	१-६-१९६२	३१-५-२०२०	
२१	श्री मनोहर वाल्मीक कोळी	सहायक अधीक्षक	१८-५-१९६२	३१-५-२०२०	
२२	श्री विजय तुकाराम ढवळे	सहायक अधीक्षक	३१-५-१९६२	३१-५-२०२०	
२३	श्री अशोक गोविंद सावंत	जमादार	१-६-१९६०	३१-५-२०२०	
२४	श्री तमन्ना रामचंद्र घागरे	हवालदार	१-६-१९६०	३१-५-२०२०	
२५	श्री आनंदा विठठल लोखंडे	वाहनचालक	१-६-१९६२	३१-५-२०२०	
२६	श्री आनंदा महादेव पाटील	हेड माळी	१-६-१९६०	३१-५-२०२०	
२७	श्री डगडू तुकाराम डवाळे	प्रयोगशाळा परिचर	१-६-१९६०	३१-५-२०२०	
२८	श्री गणपती सिताराम जाधव	उपकुलसचिव	१५-६-१९६२	३०-६-२०२०	

११.८ : डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन

स्थापना वर्ष १९६८

विद्यार्थी संख्या व वर्ग

प्रत्यक्षात अभ्यासक्रमाचे वर्ग नसल्याने ''कमवा व शिका'' योजनेंतर्गत फक्त विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली जाते. त्यासाठी सन २०१९-२० म-ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची संख्या पुढीलप्रमाणे

अ.क्र.	वर्ग	विद्यार्थी	विद्यार्थीनी	एकूण
०१	प्रथम वर्ष	२५	२९	५४
०२	द्वितीय वर्ष	४५	५९	१०४

शिक्षक :

विद्यार्थीभवनकडे प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचे वर्ग नसल्याने फक्त विद्यार्थी भवनकडे कार्यरत असलेले अधीक्षक व सहाय्यक अधीक्षक म्हणून काम करीत असलेल्या शिक्षकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

०१ डॉ. एस. डी. शिंदे मुख्य अधीक्षक

०२ डॉ. एम. एस. निबांळकर सहा. अधीक्षक

५. अन्य महत्वपूर्ण उपक्रम

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन हे ''कमवा व शिका'' योजनेंतर्गत सुरू आहे हाच एक महत्त्वपूर्ण उपक्रम विद्यापीठात राबविला जात आहे.

११.९ : इंटरनेट युनिट

स्थापना : मार्च १९९९

समन्वयक : **डॉ. मि. ज. जोशी,**

तांत्रिक सहायक : **श्री. क. श्री. देवरूखकर.**

इंटरनेट युनिटची विभागणी नेटवर्क सेल, वेबसाईट सेल व ग्रंथालय इंटरनेट हॉल अशी करण्यात आलेली आहे. विद्यापीठ प्रांगणात संगणक जाळे उभारणे व इंटरनेट सेवा पुरविणेसाठी नेटवर्क सेल हे युनिट स्थापन करणेत आलेले आहे. प्रांगणातील २७ अधिविभाग व मुख्य प्रशासकीय इमारत काचतंतूनी (Optiocal Fiber Cable) जोडली आहे. जुलै २००१ पासून सर्वत्र इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

सध्या बी. एस. एन. एल. कडून इंटरनेट सुविधेसाठी २२५ एम. बी. पी. एस. क्षमतेची लीज्ड् लाईन घेणेत आलेली आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क या योजनेअंतर्गत विद्यापीठास १ जी. बी. पी. एस्. क्षमतेची लीज्ड् लाईन प्राप्त झालेली आहे. युनिटचे समन्वयक डॉ. मि. ज. जोशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. देवरूखकर संपूर्ण नेटवर्क अद्यावत करणे व त्याची निगराणी करणेचे काम पहातात.

विद्यापीठाच्या कार्यालयीन संकेतस्थळाची (वेबसाईटची) स्थापना २० मे २००२ रोजी झाली असून संकेतस्थळ कक्ष (वेबसाईट सेल) मार्फत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईट्सची देखभाल केली जाते. ५०० वेबपेजेस पेक्षा जास्त असे संकेतस्थळाचे स्वरूप आहे. विद्यापीठाच्या सर्व परीक्षांचे निकाल, संलग्न महाविद्यालयांची परिपत्रके विविध कार्यक्रमांच्या निमंत्रणपत्रिका, विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, विविध निविदा पत्रके, नेमणूक व प्रवेश आदिंच्या जाहिराती व विविध अर्जाचे नमुने इत्यादी माहिती वेळोवेळी वेबसाईटमार्फत प्रसिद्ध केली जातात.

सदर विभागामार्फत १० पेक्षा जास्त ऑनलाईन यंत्रणा विकसित करून यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ऑनलाईन विद्यार्थी प्रत्याभरन यंत्रणा मागील सहा शैक्षणिक वर्षाकरिता राबविली असून नॅक समितीनेही याबाबत प्रशंसा

केलेली आहे. तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विद्वत सभेचे विषय व सर्व अभ्यासक्रम सी. डी. च्या स्वरूपात दिल्यामुळे वेळ, पैसा व श्रम याची मोठ्या प्रमाणावर बचत झाली आहे. या व्यतिरीक्त ऑनलाईन शिवसंदेश हे विद्यापीठाचे मासिक व इंट्रानेट हे महत्त्वाचे उपक्रम वेबसाईट सेलमार्फत सुरू आहेत. वरील विविध उपक्रमांमुळे संलग्न महाविद्यालये, विद्यार्थी व इतर वेबसाईटचा जास्त वापर करीत असल्याचे सांख्यकीय माहिती वरून दिसून आले असून अधिकाधिक माहिती व सेवा सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने वेबसाईट सेल प्रयत्नशील आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून मुख्य ग्रंथालयात ४० संगणकांची इंटरनेट सुविधा असलेली प्रयोगशाळा (इंटरनेट हॉल) स्थापित करणेत आलेली आहे. विद्यापीठाच्या प्रांगणातील विद्यार्थी, संशोधक, अध्यापक त्यांच्या अध्यनाकरीता सकाळी १०.०० ते रात्री ६.०० या वेळेत इंटरनेट सुविधेचा वापर करतात. दररोज ३५० ते ४०० विद्यार्थी, संशोधक, अध्यापक या सुविधेचा लाभ घेत आहेत.

याव्यतिरीक्त विद्यार्थ्यांना सी.डी. राईटिंगची, सुविधा व छपाईची सुविधा देखील विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. याठिकाणी डॉ. मि. ज. जोशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. इंटरनेट युनिट विद्यार्थ्यांमध्ये आय. टी. विषयक जागृती होण्यासाठी अनेक उपक्रम केले.

११.१० संगणक केंद्र

1. One day workshop on Active Directory awareness related program to all teaching and non teaching staff of the University also training was given to maintain University website on their won.

विद्यापीठात खरेदी केलेल्या खालील संगणकीय वस्तूंची पडताळणी संगणक केंद्रामार्फत करणेत आली.

Desktops = 143 **Laptops =** 10 **Projector =** 16
Server = 03 **Zero Client =** 66 **Printer =** 44
All in One = 01

संगणक केंद्रमार्फत केल्या जाणाऱ्या संगणक व संगणक प्रणालीशी साहित्याच्या देखभाली विषयीचा तपशील

संगणक	लॅपटॉप	डेस्कटॉप	ऑनलाईन	ऑफलाईन	एलसीडी-डीएलपी	सर्व्हर	थंब इन्प्रेशन मशिन	सीसीटीव्ही/ आय.पी. कॅमेरा
वार्षिक निगराणी खाली असणाऱ्या वस्तूंची संख्या	253	2378	130 +	1025 +	130	10	35	658
सर्व्हीस कॉलची संख्या	88	688	78	152	-	-	16	45

विद्यापीठामध्ये भरण्यात येणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्याचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आले आहेत. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

POST - DESC	No. Of Applications	POST - DESC	No. Of Applications
रोजंदारी कनिष्ठ लेखनिक	१५४९	रोजंदारी कुली	१८३
रोजंदारी गवंडी	७	रोजंदारी ट्रॅक्टर चालक	२९
रोजंदारी तारतंत्री	७०	रोजंदारी नळकारागीर	१५
रोजंदारी पंप ऑपरेटर	२०	रोजंदारी प्रयोगशाळा परिचर	५९५
रोजंदारी पुरुष नाईट वॉर्डन	५७	रोजंदारी फोरमन	८९
रोजंदारी महिला नाईट वॉर्डन	१०	रोजंदारी वाहन चालक	१४६
रोजंदारी शिपाई	९७४	रोजंदारी सुतार	८

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ च्या पदव्युत्तर प्रवेशासाठी प्रवेश अर्ज ऑनलाइन पध्दतीने घेण्यात आले आहेत. तसेच प्रवेश फी सुध्दा ऑनलाइन पध्दतीने घेण्यात आली आहे.

POST - DESC	No. Of Applications
Accountancy(M.Com Based Exam)	90
Accountancy(MBA Based Exam)	9
Agro-Chemical & Pest Managment	36
Bio Technology Engineering (For M.E.,M.Tech.Students)	1
Bio-Chemistry	15
Bio-Technology (For M.Sc. Students)	24
Botany	180
Business Economics(M.Com. Based Exam)	9
Business Economics(MBA Based Exam)	10
Business Management(M.Com. Based Exam)	27
Business Management(MBA Based Exam)	122
Chemical Engg.	9
Chemistry	431
Civil Engg.	141
Commerce(M.Com. Based Exam)	128
Commerce(MBA Based Exam)	13
Computer Science & Engg. (For M.E., M. Tech. Students)	125
	154
Economics	162
Education	33
Electrical Engg.	35
Electronics (For M.Sc. Students)	115
Electronics Engg. (For M.E.,M.Tech.Students)	107
Electronics and Telecommunication Engg.	419
English	23
Environmental Science & Engg. (For M.E.,M.Tech.Students)	28
Environmental Science (For M.Sc. Students)	126
Geography	151
Hindi	196
History	12
Home Science	142
Library and Information Sciences	303
Marathi	166
Mathematics	179
Mechanical Engg.	71
Microbiology	45
Nano-Science and Technology	274
Pharmacy	65

Physical Education	387
Physics	153
Political Science	65
Psychology	75
Sociology	29
Statistics	11
Textile Engg.	143
Zoology	

११.११ आभियांत्रिकी विभाग

(१) नवीन प्रस्ताव

१. यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाकरीता इमारत बांधणे.

२. फॅकल्टी हाऊसकरीता इमारत बांधणे.

३. विद्यापीठ परिसरामध्ये कन्व्हेंशन सेंटर बांधणे.

४. मुलांचे वसतिगृह बांधणे.

५. विद्यापीठ परिसरात उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे बांधकाम करणे.

६. विद्यापीठ परिसरातमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम करणे.

७. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणेकरीता सबवेचे बांधकाम करणे.

८. विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाची इमारत बांधणे. (दुसरा टप्पा)

९. भाषाभवन इमारतीमध्ये इंग्रजी विभागाकरीता इमारतीचे विस्तारीकरण करणे.

१०. शिवाजी विद्यापीठ परिसरातीभोवती संरक्षक भिंत बांधणे.

११. शिवाजी विद्यापीठ सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर अंतर्गत दुरुस्ती व सजावटीची कामे करणे.

१२. शिवाजी विद्यापीठ परिसरात अभियांत्रिकी विभागासाठी नूतन इमारत बांधणे.

१३. शिवाजी विद्यापीठ परिसरातील अपार्टमेंट इमारतीचे विस्तारीकरण करणे.

१४. शिवाजी विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याभोवतालच्या बागेच्या बाह्य गोल आकारासाठी कठडयाच्या बाहेरील बाजूने ट्रॅप/बसाल्ट प्रकारच्या दगडाचे नकाशाप्रमाणे कोरीव व घडीव काम करून बसविणे.

१५. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मुलांच्या वसतिगृह क्रमांक-१ साठी प्रस्तावित टॉयलेट ब्लॉक बांधकाम

१६. राजर्षि छत्रपती शाहू संशोधन केंद्र व संग्रहालय येथील संरक्षक भिंत बांधणे.

१७. सातारा येथील कर्मवीर छाया बंगल्यासाठी कुंपण घालणे आणि बाह्य रंगकाम तसेच विविध स्थापत्य कामे करणे.

१८. राजर्षि छत्रपती शाहू संशोधन केंद्र आणि संग्रहालयाचेअंतर्गत काम.

१९. स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागात ॲल्युमिनियम पार्टीशन करणे.

(२) शिवाजी विद्यापीठ परिसरातील पूर्ण झालेली व सुरू असलेली मुख्य बांधकामे.

१. रिसर्च स्कॉलर वसतिगृहाशेजारी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे.

२. संगीतशास्त्र तलावाशेजाराचा परिसर सुशोभित करणे.

३. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्यासाठी नवीन स्वच्छतागृह बांधणे.

४. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी नामफलक, दिशादर्शक बसविणे.

५. विद्यापीठ परिसरामध्ये रिसर्च स्कॉलर विद्यार्थी वसतिगृह बांधणे. (दुसरा मजला)

६. शिवाजी विद्यापीठ परीसरातील रस्ते करणे व वाहनतळ तयार करणे.

७. विद्यापीठ परिसरांतर्गत पाणी वितरण नलिकांचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे.

८. वनस्पतीशास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.

९. भौतिकशास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.

१०. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरामध्ये पाणी वितरणनलिका सुस्थापित करणे.

११. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये विविध इमारतींचे रंगकाम करणे.

१२. शिवाजी विद्यापीठ परिसरामधील विविध इमारतींचे प्रवेशद्वार नूतनीकरण व अन्य स्थापत्य कामे करणे.

१३. शिवाजी विद्यापीठ परिसरामधील मुख्य प्रवेशव्दार नूतनीकरण व सक्षमीकरण करणे.

१४. शिवाजी विद्यापीठ परिसरामधील गणित अधिविभागातील दुरूस्ती व देखभालीचे काम.

१५. शिवाजी विद्यापीठ परिसरामधील डॉ. बाळासाहेब खर्डेकर नॉलेज रिसोर्स इमारतीत दुरुस्तीचे नूतनीकरण व इतर स्थापत्य कामे.

१६. भाषा इमारतीत खिडक्यांसाठी छज्जांची व्यवस्था करणे (इंग्रजी, मराठी आणि विदेशी भाषाविभाग)

१७. व्ही.व्ही.आय.पी. गेस्ट हाऊसची दुरुस्ती व नूतनीकरण

१८. आंतरराष्ट्रीय वसतिगृहासाठी पाच बंगल्याची दुरुस्ती व नूतनीकरण.

१९. शिवाजी विद्यापीठासाठी टायटॅनियम स्टेनलेस स्टील शीटवर दोन मुख्य गेट्स दरम्यान विद्यापीठाचे नेमबोर्ड.

२०. लोक कला केंद्राचे अद्ययावतीकरण करणे – फेज १.

२१. आरोग्य केंद्रावर टिन शीटमध्ये छप्पर घालणे.

२२. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीमधील अर्थशास्त्र विभागाच्या कॉन्फरन्स रूम व संगणक प्रयोगशाळेचे अंतर्गत काम.

२३. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरामध्ये पाणी साठवण विहीर तयार करणे.

२४. मुख्य इमारतीमधील व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहाचे नूतनीकरण.

२५. भूगोलशास्त्र अधिविभाग येथे जियोकेमिकल प्रयोगशाळेचे काम

२६. विद्यापीठ परिसरातील विविध इमारतींच्या टेरेसवर ॲक्रेलिक पॉलिमर सिमेंटवर आधारीत जलरोधक प्रक्रिया करणे.

२७. मानव्यशास्त्र इमारतीचे स्ट्रक्चरल रिहॅबिलेटेशन व जलरोधक प्रक्रिया करणे.

२८. मुलांच्या वसतिगृहाच्या परिसरातील ड्रेनेजच्या कामाची दुरुस्ती व ड्रेनेज लाइन एसटीपी प्रक्रिया केंद्राला जोडणे.

■■■

११.१२ मुद्रणालय विभाग

उपरोक्त संदर्भीय टिपणीनुसार शिवाजी विद्यापीठातील मुद्रणालय विभाग हा मा. कुलसचिव यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्यरत असून विभागातील कार्यालयामध्ये १ अधिक्षक, १ क्लार्क छपाई विभागात ४, बांधणी विभागात ५ कायमस्वरूपी कर्मचारी व ३० रोजंदारी कर्मचारी काम करतात. सन ०१.०७.२०१९ ते ३०.०६.२०२० पर्यंत झालेल्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	विभाग/अधिविभागाचे नाव	तपशील	संख्या
१	परीक्षा गोडावून विभाग	उत्तरपत्रिका छपाई महाविद्यालयीन परीक्षा (केशरी कलर)	२४ पानी – ७,३०,००० ४ पानी प्रॅक्टीकल – २,००,०००
		विद्यापीठ परीक्षा (ब्लॅक कलर)	४ पानी प्रॅक्टीकल – १०,००,००० २४ पानी – ११,५०,००० २८ पानी – २,००,००० २८ पानी ग्राफ – १,१५,००० ३६ पानी – १,२०,००० ४० पानी – ४,५०,०००
२	दूरशिक्षण विभाग	बी.ए. एम.ए. बी.कॉम. एम.कॉम. एम.एस्सी. एम.बी.ए. बी.ए. बी.कॉम. माहितीपत्रक	२१ पुस्तके ३९ पुस्तके १३ पुस्तके ३ पुस्तके १० पुस्तके २७ पुस्तके २ पुस्तके ०५
३	अभ्यास मंडळे विभाग	पर्यावरण – इंग्रजी पर्यावरण – मराठी बी.ए. भाग २ इंग्रजी बी.कॉम. भाग २ इंग्रजी बी.ए. भाग २ मराठी काव्यगंध बी.ए. भाग १ मराठी विद्याशाखीय बी.ए. भाग २ मराठी भाषिक कौशल्ये बी.ए., बी.कॉम.	९,६०० १३,००० ५००० ५००० २००० ३००० २००० ४०००
४	दीक्षांत विभाग	पदवी प्रमाणपत्र छपाई व लॅमिनेशन	५००००
५	इतर सर्व विभाग	वार्षिक अहवाल, परीक्षा फॉर्म, पावती पुस्तके, लेजर इ.	

■■■

१२. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा

१. अधिसभा

अहवाल कालावधीत अधिसभेच्या एकूण दोन बैठका झाल्या. सदर झालेल्या बैठकीमधील निर्णय खालीलप्रमाणे –

दिनांक १३ डिसेंबर,२०१९

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ७९(३)(ड) अन्वये अध्यापकेतर सदस्य म्हणून श्री. राम तुपे, अधिसभा सदस्य यांचे तक्रार निवारण समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.
- सन २०१८-२०१९ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मान्य करण्यात आला.
- विद्यापीठाच्या विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जो भत्ता दिला जातो त्याप्रमाणेच सांस्कृतिक स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही असा भत्ता दिला जावा अशी शिफारस अधिसभेने वित्त व लेखा समितीस केली.
- मागील काही वर्षामध्ये विद्यापीठाने शिक्षकांच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक योजना सुरू केलेल्या आहेत, त्याप्रमाणे प्रशासकीय सेवकांसाठीसुद्धा काही योजना राबवाव्यात अशी शिफारस अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केली.
- बैठकीच्या कामकाजासंदर्भात लागू करण्यात आलेल्या परिनियमाप्रमाणे अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद इत्यादी अधिकार मंडळाचे कार्यवृत्तांत तयार करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणेच विद्यापीठातील इतर बैठकांच्या कामकाजाचे कार्यवृत्तांत तयार करण्यासाठीचा कालावधी निश्चित करणारी नियमावली तयार करावी, अशी शिफारस अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केली.

दिनांक १२ मार्च,२०२०

- विद्यापीठाचे सन २०१९-२०२० चे सुधारीत अंदापजत्रक व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अंदाजपत्रक मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस एक मताने मान्य करण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील ५६ वा वार्षिक अहवाल (मराठी आवृत्ती) मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस एक मताने मान्य करण्यात आली.
- विद्यापीठातील व संलग्नीत महाविद्यालयातील प्रशासकीय सेवक यांच्या संशोधन कार्यास चालना मिळणेसाठी कुलगरू संशोधन प्रोत्सहान योजना Vice Chancellor Reserach Motivation Scheme for Non-Teaching सुरू करण्यात यावी अशी शिफारस अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केली.
- शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निकालाचे Legers Scanning करून Digital format मध्ये ठेवण्यात यावेत, अशी शिफारस अधिसभेने परीक्षा व मूल्यमापन मंडळास केली.

३. व्यवस्थापन परिषद बैठक

अहवाल कालावधीत व्यवस्थापन परिषदेच्या एकूण सोळा बैठका झाल्या. सदर झालेल्या बैठकीमधील निर्णय खालील प्रमाणे –

दिनांक ३० ऑगस्ट २०१९

- IUMS Cell विद्यापीठात व संलग्नीत महाविद्यालयात स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.
- दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारिरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित करणे व आरक्षण अंमलबजावणीचा शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ दि. २९.०५.२०१९ ची नोंद घेण्यात आली.
- Shivaji University, Kolhapur, India and Consortium वित्त Edicational Communication, New Delhi यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्याबाबत मा.कुलगुरुंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

* इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिर्व्हसिटी नवी दिल्ली (IGNOU) यांच्याशी दूरशिक्षण केंद्रामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयं अध्ययन साहित्य लेखक यांना प्रशिक्षण देणे, स्वयं:अध्ययन साहित्य स्वीत करणे तसेच दूरशिक्षणाशी संबधित इतर अनुषंगिक बाबीकरिता सामंजस्य करार करण्याच्या अनुंषगाने प्रस्ताव पाठविण्याकरिता तत्वत: मान्यता देण्यात आली.

दिनांक ११ सप्टेंबर २०१९

* दर वर्षी १८ नोव्हेंबर विद्यापीठ वर्धापनदिनी प्रचलित शिक्षकांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकाच्या स्वरूपाप्रमाणे शिवाजी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पारितोषिक देण्यास मान्यता देण्यात आली.
* सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात लोकविकास केंद्राचा 'आरोग्य सहायक' अभ्यासक्रमासाठी दलित महिला विकास मंडळ, सातारा या संस्थेकडून कार्यवाही शुल्क फिक्स रु.१०००/- आणि प्रती विद्यार्थी प्रशिक्षण व मूल्यमापन शुल्क रु.२५०/- याप्रमाणे शुल्क घेण्यास मान्यता देण्यात आली.
* विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तसेच विद्यापीठ शिक्षक व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमार्फत स्वावलंबी तत्वावर सुरू असलेल्या अभ्यासक्रमाचे २५% शैक्षणिक शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली.
* वाहन विभागाकरीता विद्यापीठ निधीतून वेतनश्रेणीवर ०५ कायमस्वरूपी वाहनचालकांची नविन पदे निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली.
* ज्या विद्यार्थ्यास कोणतीही स्कॉलरशिप/फेलोशिप/वेतन (पूर्ण वेळ नोकरीतील वेतन) मिळत नाही त्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रमाचे शुल्क विहित मुदतीत न भरल्यास त्यांना दरवर्षीच्या ट्युशन फी च्या ५०% दंड आकारण्यात यावा.

दिनांक २५ सप्टेंबर २०१९

* विद्यापीठातील निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शासन परिपत्रकानुसार निवृत्तीच्या दिनांकापासून कायमस्वरूपी विहित नमुन्यामधील ओळखपत्र देण्यास मान्यता देण्यात आली.

दिनांक २३ ऑक्टोबर २०१९

* विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राकडे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून हंगामी स्वरूपात भरण्यात येणा-या हंगामी सहयोगी प्राध्यापक पदांच्या रू.२५,०००/- या एकत्रित मानधनात वाढ करून एकत्रित मानधन रू.३५,०००/- करणेबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
* महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ५६ (च) अन्वये विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयात कमवा व शिका योजना सुरु करण्यासंदर्भातील नियमावलीस मान्यता देण्यात आली.
* सर्व प्रकारच्या Payment Gatway साठी QR Code ची सुविधा उपलब्ध करून देणे बाबत दि.१८-९-२०१९ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
* शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये छायाचित्रण स्पर्धा नोव्हेंबर, २०१९ मध्ये आयोजित करणेस व नियमावलीस मान्यता देण्यात आली. सदरची छायाचित्रण स्पर्धा दर पाच वर्षानी आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.
* ज्या अधिविभागाचे सूवर्ण महोत्सवी वर्ष आहे त्यांना रु.५ लाख निधी विद्यापीठ फंडातून देण्यास मान्यता देण्यात आली.
* Shivaji University, Kolhapur, Maharashtra, India and Tamil University, Thanjavur यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मा. कुलगुरू यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

दिनांक १५ नोव्हेंबर २०१९

* विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह (सिनेट हॉल) येथे दर्शनिभागी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांची प्रतिमा लावणेस मान्यता देण्यात आली.
* वनस्पतीशास्त्र अधिविभागातील लीड बोटॅनिकल गार्डनला भेटी देण्याऱ्या व्यक्तींकडून खालीलप्रमाणे फी आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

१. शालेय विद्यार्थी – रुपये ५/–
२. महाविद्यालयीन विद्यार्थी– रुपये १०/–
३. संशोधक विद्यार्थी– रुपये १५/–
४.शिक्षक / प्राध्यापक / राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक– रुपये २५/–

वनस्पतीशास्त्र अधिविभागात Walk with Lead Botanical Garden उपक्रम राबविण्याबाबत मान्यता देण्यात आली. पर्यटकांना एका शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली एका संशोधक विद्यार्थ्याने Lead Botanical Garden संबंधी माहिती द्यावी. या करीता ज्या संशोधक विद्यार्थांना कोणतेही विद्यावेतन मिळत नाही अशा विद्यार्थ्यास प्रति भेट रु.५००/– मानधन देण्यात यावे.

दिनांक २७ नोव्हेंबर २०१९

- शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे कार्यशाळा आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

दिनांक ०४ डिसेंबर २०१९

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ७९(५) च्या तरतूदी नुसार तक्रार निवारण समिती अध्यक्ष यांना पारिश्रमिक व वाहनभत्ता प्रति दिन रू.७,०००/– इतका देण्यास मान्यता देण्यात आली.
- Shivaji University, Kolhapur, India and Hochschule Hannover University of Applied Science and Arts Germany यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्याबाबत मा. कुलगुरूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस शासन मान्यतेच्या अधीन राहून मान्य करण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या आर्थिक तरतूदीतून रू.१०,०००/– या एकत्रित मानधनावर डॉ. पुरंदर चौगुले यांची पूर्णवेळ समन्वयक पदी नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली.

दिनांक २६ डिसेंबर २०१९

- संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याबाबतच्या मानकांशी संबंधित एकरुप परिनियम (Uniform Statute) मधील तरतूदीनुसार दोन वर्षाची संलग्नीकरण शुल्क होईल इतकी रक्कम आकारण्यास मान्यता देण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात दिल्या जाणाऱ्या 'दि प्रेसिडेन्ट ऑफ इंडिया मेडल फॉर जनरल प्रोफिसियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी' या पारितोषिकाच्या छाननी व निवड समितीवर ॲड. धैर्यशील पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे नाव सूचित करण्यात आले.

दिनांक १६ जानेवारी २०२०

- तंत्रज्ञान अधिविभागातील B-Tech in Electronics And Communication Technology व B-Tech In Chemical Technology या दोन कोर्सेसचे नामाभिदान B-Tech Electronics And Telecommunication Engineering व B. Tech in Chemical Engineering असे करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
- अनुदानित अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ट्युशन फी व लॅब फी व्यतिरिक्त अन्य (विकास निधी, ग्रंथालय शुल्क, नियतकालिक शुल्क, सांस्.तिक शुल्क, एस.ए.फंड, जिमखाना शुल्क) शैक्षणिक शुल्क सुधारित करून विना अनुदानित अभ्यासक्रमांच्या दि.०४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार लागू करणेस मान्यता देण्यात आली.
- महात्मा गांधी शतकोत्तर सूवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त निबंध, पोस्टर व वक्तृत्व स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहेत. त्याच्या परिक्षकांचे व पुरस्कारांचे मानधन रोख स्वरूपात देण्यास मान्यता देण्यात आली.
- Shivaji University, Kolhapur India and Tehe Veer Surendra Sai University of Technology Burla, Orissa यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्याबाबत मा. कुलगुरूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस

मान्य करण्यात आली.

दिनांक ०३ फेब्रुवारी २०२०

* ५६ व्या दीक्षान्त समारंभ सोहळ्यामध्ये विविध अभ्यासक्रमाची पदवी / पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस मान्य करण्यात आली.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२०

* अधिसभेस शिफारस करण्यात येते की, विद्यापीठाचे सन २०१९-२०२० चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२०-२०२१ चे वार्षिक अंदाजपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार मान्य करण्यात यावे. सदर ठराव मांडण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. पाटील धैर्यशील बाळासाहेब यांचे नामनिर्देशन करण्यात आले.
* महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३७ (१) (ञ) आणि (ट) मधील तरतुदीनुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये मान्यताप्राप्त संस्थांचे विद्याविषयक लेखा परिक्षण (Academic Audit) करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या अर्ज नमुन्याच्या आणि अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीच्या अनुषंगाने विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
* शिवाजी विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील ५६ वा वार्षिक अहवाल (मराठी आवृत्ती) मान्य करण्यात येउन अधिसभेस शिफारस करण्यात आली. अधिसभेमध्ये ५६ वा वार्षिक अहवाल सादर करण्यासाठी श्री. संजय जाधव याचे नामनिर्देशन करण्यात आले.

दिनांक २६ फेब्रुवारी २०२०

* शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (मराठी अधिविभाग, इतिहास अधिविभाग, राज्यशास्त्र अधिविभाग) आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांच्या दरम्यान ज्ञानमंडळ स्थापन करणेबाबत झालेल्या सामंजस्य करारांचे दि.२९/१२/२०१९ ते दि.२८/१२/२०२० या एक वर्षाच्या कालावधी करीता पूर्वलक्षी प्रभावाने नूतनीकरण करण्याबाबत मा. कुलगुरू यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
* शिवाजी विद्यापीठच्या Gender Policy ला मान्यता देण्यात आली.

दिनांक २० मार्च २०२०

* विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.२६/०३/२०१९ च्या सार्वजनिक सूचनेनुसार १२ व्या पंचवार्षिक योजनेतील विविध योजनांची मुदत दि.३१/०३/२०२० रोजी संपत असल्याची नोंद घेण्यात आली.
* विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेतील नमूद सहा योजनांना दिनांक ०१/०४/२०२० पासून एका वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.
* मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.०९/०३/२०२० रोजीचे विद्यापीठामध्ये अद्यावत तंत्रज्ञान निर्माण करणेच्या दृष्टीने प्रकल्प सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

दिनांक २१ एप्रिल २०२०

* छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतच्या कार्यपद्धती बाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करावी. शासन निर्णय निर्गमित होईतोपर्यंत सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यापीठातील विविध अधिविभागातील विभागप्रमुखांच्या शिफारशीनुसार अधिविभागांची शैक्षणिक निकड पाहता तांत्रिक बाबी तपासून तासिका तत्वावर शिक्षक उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.
* डॉलरमध्ये होणाऱ्या बदलानुसार विद्यापीठ निधीतून आवश्यक रक्कम उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

दिनांक १२ मे २०२०

* कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व तदअनुषंगाने सर्व विद्यापीठांच्या परीक्षांची कार्यप्रणाली ठरविण्यासाठी विद्यापीठ अनुदान

आयोगाने गठित केलेल्या समितीच्या दि.२९.०४.२०२० रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना व राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठित केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवालाची व विद्यापीठ स्तरावर प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीची नोंद घेण्यात आली.

४. **व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांची संयुक्त बैठक दि.२३/०१/२०२० रोजी झाली. सदर बैठकीतील निर्णय खालील प्रमाणे,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम 11(3)(a) (iii) आणि कलम 11(3)(c) मधील तरतूदींनुसार प्रा.डॉ. अश्विनी कुमार नांगिया, संचालक, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे यांचे कुलगुरू निवड समितीवर एकमताने नामनिर्देशन करण्यात आले.

२. विद्यापरिषद बैठक

अहवाल कालावधीत विद्यापरिषदेच्या एकूण चार बैठका झाल्या. सदर झालेल्या बैठकीमधील निर्णय खालील प्रमाणे,

दिनांक २० डिसेंबर,२०१९

- प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये Centre of Excellence and Incubation पद स्थापन करणेबाबत अधिविभागप्रमुख, प्राणीशास्त्र अधिविभाग यांचा प्रस्तावाबाबत अधिष्ठाता मंडळाची शिफारस मान्य करून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ कलम १०१ नुसार गठीत शुल्क निर्धारण समितीने विविध विनाअनुदानीत अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क सुधारितधनिश्चित करण्याबाबत विद्यापरिषदेस केलेली शिफारस मान्य करून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.
- आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत काही नवीन निरंतर शिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याकरीता महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.

दिनांक २३ जानेवारी,२०२०

- ५६ व्या दीक्षांत समारंभ सोहळ्यामध्ये पदवी-पदविका प्रमाणपत्रे, अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.
- शोधनासंदर्भात धोरणाच्या (Research Policy) मसुद्यास मान्यता देणेबाबत संशोधन मंडळाने केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.
- शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य निवड समितीवर अन्य विद्यापीठातील तज्ज्ञ निमंत्रित करण्यास मान्यता देण्यात आली.

दिनांक २७ मे, २०२०

- आर्टस् सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली), किर्लोस्करवाडी, ता. पलूस, जि. सांगली या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने बैठक दि. २५/०२/२०२० विषय क्र. ०६ अन्वये केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४४ मधील तरतुदीनुसार गठित महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाच्या (दि.२१/०१/२०२०) बैठकीतील ठरावानुसार संलग्नीत महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समन्वयक (co-Ordinator) नेमण्याकरिता मान्यता देण्यात आली व त्याबाबतचे सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.
- बहाई ॲकॅडमी पाचगणी यांचेकडून प्राप्त झालेले १) Fostering Personality Development and Social Progress २) ASHa (Ability, Skills and Healthy Attitude) (2 Credit Courses) अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत १. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, २. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, ३. मानवविज्ञान विद्याशाखा, ४. आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांची शिफारस दुरूस्तीसह मान्य करण्यात आली.

- सर्व संलग्नित महाविद्यालयीन स्तरावर Swayam Mooc's चे Online Courses लागू करणे संदर्भात विद्यापरिषदेने गठित केलेल्या समितीने तयार केलेली मार्गदर्शक तत्वे लागू करण्यास मान्यता देण्यात आली.
- Central Research Committee (CRC) संदर्भात R. R. D. 6.2 मधील समितीच्या रचनेमध्ये बदल करणेबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

दिनांक १५ जून, २०२०

- श्री. अंबाबाई तालीम मिरज या संस्थेचे डॉ. पद्मसिंह पाटील कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, मिरज, जि. सांगली हे महाविद्यालय जून २०२०-२१ पासून कायमस्वरूपी बंद करण्याबाबत गठित स्थानिक चौकशी समितीची शिफारस व दि.२१.०३.२०२० रोजीच्या अधिष्ठाता मंडळ बैठकीमधील विषय क्र.१३ च्या ठरावान्वये केलेली शिफारस मान्य करून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि.कोल्हापूर या महाविद्यालयाकडून सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात गठीत स्थानिक चौकशी समितीच्या गुणांक पद्धतीवर आधारीत अहवालातील निरीक्षणांच्या आधारे प्राप्त गुण, अटी, शिफारस व छाननी समितीचा अभिप्राय मान्य करण्यात आला.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयाकडून सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात गठीत स्थानिक चौकशी समितीच्या गुणांक पद्धतीवर आधारीत अहवालातील निरीक्षणांच्या आधारे प्राप्त गुण, अटी, शिफारस व छाननी समितीच्या अभिप्रायाची नोंद घेण्यात आली.
- सदर अभ्यासक्रमास एक वर्षाकरिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण देण्यास मान्यता देण्यात आली. प्रयोगशाळा मान्यतेसंदर्भात किमान दोन मार्गदर्शक असलेची विषयामध्ये नोंद असल्याने छाननी समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार स्थानिक चौकशी समितीची शिफारस मान्य करण्यात आली.

■■■

१३. क्रीडा मंडळ व संवर्धन मंडळ

२०१९-२० या शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत मिळालेले सुयश

वैयक्तिक व सांघिक मेडल्स

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ, क्रीडा महोत्सव व खेलो इंडिया स्पर्धेमध्ये खालील खेळ प्रकारामध्ये विद्यापीठ संघाने सांघिक व वैयक्तिक यश सपंदान केले आहे.

१) कुस्ती फ्री स्टाईल व ग्रिको रोमन (पुरूष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

दि.१४/११/२०१९ ते दि. १८/११/२०१९ या कालावधीमध्ये गुरू जांभेश्वर विद्यापीठ हिसार येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ कुस्ती (पुरूष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये वैयक्तिक यश सपंदान केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	कुस्ती फ्री स्टाईल १२५ किलो (पुरुष) (श्रीपतराव चौगले आटर्स आणि कॉमर्स कॉलेज, कोतोली)	श्री. मंगवडे अक्षय सतपाल, वैयक्तिक	कांस्य पदक
२.	कुस्ती ग्रिको रोमन ६३ किलो (पुरुष) (एम. एच शिंदे महाविद्यालय, तिसंगी)	श्री. पाटील मनातेश मुरलीधर, वैयक्तिक	कांस्य पदक
३.	कुस्ती ग्रिको रोमन ९७ किलो (पुरुष) (शिवराज कॉलेज, गडहिग्लज)	श्री. रंडे रोहन रंगराव वैयक्तिक	रौप्य पदक

संघव्यवस्थापक - प्रा. बी. डी. पाटील, एम. एच शिंदे महाविद्यालय, तिसंगी

प्रशिक्षक - प्रा. डि. के. पवार, के. बी. पी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँन्ड पॉलि. सातारा.

२) आर्चरी (पुरुष व महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. २६/१२/२०१९ ते दि. ३०/१२/२०१९ या कालावधीमध्ये के. आय. आय. टी भुवनेश्वर, येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ आर्चरी (पुरुष व महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये वैयक्तिक यश सपंदान केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	आर्चरी (महिला) ५० मीटर इडियन राउंड (किसनवीर महाविद्यालय, वाई)	श्रीमती अमिता सुनील जाधव वैयक्तिक	रौप्य पदक

प्रशिक्षक- प्रा. एस. ए. पवार

किसनवीर महाविद्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा.

३. वेट लिफ्टींग (महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.२८/१२/२०१९ ते दि. ३०/१२/२०१९ या कालावधीमध्ये मनोंमानियलम संधरानार विद्यापीठ त्रिन्युवली तमिळनाडू येथे झालेल्या अखिल भारतीय आतंर विद्यापीठ वेट लिफ्टींग (महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	वेट लिफ्टींग (महिला) ८१ किलो (आटर्स कॉमर्स महाविद्यालय, सातारा)	श्रीमती देवर मयुरी रामचंद्र वैयक्तिक	रौप्य पदक

प्रशिक्षक – प्रा. एस. एल. गोनुगडे,
क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, तारदाळ.
संघव्यवस्थापक कम – प्रा. बी. आय. कुरणे
टि. के. आय. टी. महाविद्यालय, वारणानगर

४) वेट लिटींग आणि बेस्ट फिजीक्स (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१५/१२/२०१९ ते दि. १९/१२/२०१९ या कालावधीमध्ये चंदीगड विद्यापीठ, मोहाली येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ वेट लिफ्टींग (पुरुष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	वेट लिटींग (पुरुष) ५५ किलो (आटर्स कॉमर्स महाविद्यालय, आष्टा)	श्री. सरगर संकेत महादेव वैयक्तिक	सुवर्ण पदक
२.	वेट लिटींग (पुरुष) १०९ किलो (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लंज)	श्री. वाळके अक्षय हरीबा वैयक्तिक	सुवर्ण पदक
३.	वेट लिटींग (पुरुष) ६५ किलो (वाय. सी. वारणा महाविद्यालय, वारणानगर)	श्री. पाटील संतोश संभाजी वैयक्तिक	सुवर्ण पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक– प्रा. एस. एल. गोनुगडे,
क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, तारदाळ.
संघव्यवस्थापक – श्री व्ही. एस यमगेकर विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

५. बॉक्सीग (महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. २०/१२/२०१९ ते दि. २४/१२/२०१९ या कालावधीमध्ये चौ. चरण सिंह विद्यापीठ, मिरठ येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ बॉक्सीग (महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	बॉक्सींग (महिला) ६९ ते ७५ किलो (विवेकांनद कॉलेज, कोल्हापूर)	श्रीमती सासणे सनिका कृष्णा वैयक्तिक	कास्य पदक

प्रशिक्षक – प्रा. प्रदीप व्ही. भोसले
बी.पी. इएड महाविद्यालय, कुरूंदवाड
संघव्यवस्थापक कम – प्रा. व्ही. डी. ननावरे,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

६) पॉवर लिफ्टींग (महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. २०/०२/२०२० ते दि. २५/०२/२०२० या कालावधीमध्ये मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ पॉवर लिफ्टींग (महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	पॉवर लिफ्टींग (महिला) ५७ किलो (श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर)	श्रीमती. सावरडेकर जान्हवी जगदीश वैयक्तिक	रौप्य पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक – प्रा. एस. एल. गोनुगडे,
क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, तारदाळ.

७) कायाकींग (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१९/०२/२०२० ते दि. २२/०२/२०२० या कालावधीमध्ये मोहनलाल सुखडिया विद्यापीठ, उदयपूर येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ कायाकींग (पुरुष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	कायाकींग (पुरुष) के-१ २००मीटर (डी. आर. माने महाविद्यालय, कागल)	श्री. नेरलेकर गिरीश संजय वैयक्तिक	सुवर्ण पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक - डॉ. डी. जे. पाटील
आजरा महाविद्यालय, आजरा.

८) तलवारबाजी (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.३०/१२/२०१९ ते दि. ०१/०१/२०२० या कालावधीमध्ये विद्यापीठ ऑफ जम्मू, जम्मू येथे झालेल्या अखिल भारतीय आतंर विद्यापीठ तलवारबाजी (पुरुष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	तलवारबाजी (पुरुष) फॉईल (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज)	श्री. येडेकर विपूल प्रशांत वैयक्तिक	कास्य पदक
२.	तलवारबाजी (पुरुष) सेबर (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज)	श्री. अंगल अदित्य अतुल वैयक्तिक	रौप्य पदक

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	तलवारबाजी (पुरुष) फॉईल (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज) (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज) (जी. ए कॉलजे ऑफ कॉमर्स, सांगली) (श्रीमती कस्तुबाई वालचंद कॉलेज, सांगली)	१. श्री. येडेकर विपूल प्रशांत २. श्री शिंदे प्रथमकुमार रविद्र ३. श्री जकाते गिरीश वैभव ४. श्री पाटील मोरष्वर राजेंद्र सांघिक	रौप्य पदक
२.	तलवारबाजी (पुरुष) सेबर (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज) (शिवराज महाविद्यालय, गडहिग्लज) (किसन वीर महाविद्यालय, वाई) (के आय टी ऑफ मॅनेजमेंन्ट कॉलेज, कोल्हापूर)	१. श्री. अंगल अदित्य अतुल २. श्री. जाधव धनजय राजाराम ३. श्री. सनस प्रसाद राजेंद्र ४. श्री. जाधव प्रतीक राजू सांघिक	कास्य पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक - डॉ एम आर पाटील
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी
सहायक संघव्यवस्थापक - श्री. एम. डी. लगीवाले
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज

९) जलतरण (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.०१/११/२०१९ ते दि. ०४/११/२०१९ या कालावधीमध्ये लव्हली प्रोप्रेशनल विद्यापीठ, जालंधर येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ जलतरण (पुरुष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	जलतरण (पुरुष) ४ X २००फ्री स्टाईल रीले टिम	१. श्री. देसाई अदित्य जिंतेद्र (द न्यु कॉलेज, कोल्हापूर) २. श्री मोरे प्रथमेश सदाशीव (नाईट कॉलेज ऑफ आटर्स आणि कॉमर्स,कोल्हापूर) ३. श्री. नाईक राजर्वधन जयसिंग ४. श्री. नाईक हर्षर्वधन जयसिंग (गोपाल कृष्णा गोखले कॉलेज, कोल्हापूर) सांघिक	कास्य पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक – श्री एस ए खराडे
भोगवती महाविद्यालय, कुरुकली

१०) खो–खो (पुरुष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

दि.२८/१२/२०१९ ते दि. ३०/१२/२०१९ या कालावधीमध्ये कोयपू विद्यापीठ, शिमोगा येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ खो–खो (पुरुष) या स्पर्धेमध्ये सांघिक खेळ प्रकारामध्ये यश संपादन केले आहे

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	खो–खो (पुरुष) टिम	१. श्री. केरिपाळे अभिषेक विजय २. श्री. वाद्यमारे आकाश राजेंद्र (श्रीमती कस्तुबाई वालचंद कॉलेज, सांगली) ३. श्री. शिंदे अजय सुकुमार ४. श्री बागवान तौफिक शौकत (नाईट कॉलेज ऑफ आटर्स कॉमर्स, इचलकंरजी) ५. श्री कदम शुभम शिवाजी (एस के पाटील कॉलेज, कुरूदवाड) ६. कांबळे ऋषिकेश गंगाराम ७. श्री. पाटील राजवर्धन शंकर (आण्णासाहेब डांगे आटर्स कॉमर्स सायन्स कॉलेज, हातकलंगले) ८. श्री. पाटील अधिक मानिक (मोहनराव पंतगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव) ९. श्री पटेल अकिब कसम (एस. जी. एम. कॉलेज, काराड) १०. श्री. कांबिरे प्रवीण प्रताप वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड) सांघिक	कास्य पदक

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक – श्री. एस. टी. पाटील,
मोहनराव पाटील महाविद्यालय, बोरगाव

११) रग्बी (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.२६/१२/२०१९ ते दि. ३०/१२/२०१९ या कालावधीमध्ये पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ रग्बी (पुरुष) या स्पर्धेमध्ये १५ + या संघाने रौप्य पदक (Silver Medal) तसेच ७ + संघाने कांस्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	रग्बी (पुरुष) १५ +	१) श्री. चव्हाण भारत फत्तू २) श्री. चव्हाण सोमनाथ देवराम ३) श्री. कोठारीकी ईश्वरराज शरणाप्पा राधानगरी कॉलेज, राधानगरी ४) श्री. गुप्ता गोविंद उमाशंकर (कॉलेज ऑफ फिजीकल एज्यू. वाडीपीयर) ५) श्री. निगडे श्रीधर श्रीकांत ६) श्री. मुल्लाणी अमीर महमद (दुकध साखर महाविद्यालय, बिद्री) ७) श्री. वाघमारे तुकाराम बाबसो राजे रामराव कॉलेज, जत ८) श्री. राजेभोसले दीपराज शहाजी ९) श्री. पाखरे शिवप्रसाद सुरेश १०) श्री. पठाण मुराद रफिक (एल. बी. एस कॉलेज, सातारा) ११) श्री. खाडे सुमेश रविंद्र १२) श्री. जगताप ओमकार सुरेश (भोगावती कॉलेज, कुरूकली) १३) श्री. पाटील भैरूनाथ कृश्णात १४) श्री. कांबळे सुरज मधूकर (स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे) १५) श्री स्वामी केदार मोहन १६) श्री. भिसे शुभम दिनकर (आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा) १७)श्री. लंबे यश अनिल श्री लहू बाळा परीटकर कॉलेज, पनोरे १८) श्री. कणसे मयुर हणंमत वाय सी कॉलेज, सातारा १९) श्री. पाटील धिरज धनाजी (पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा.) २०) श्री पाटील वैभव मारूती डी आर माने कॉलेज, कागल २१) श्री पाटील कौलवकर विरसेन विश्वासराव	रौप्य पदक

		के आय टी कॉलेज, कोल्हापूर २२) पाटील वल्लभ रामचंद्र आटर्स कॉमर्स कॉलेज, कोवाड सांघिक	

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	रग्बी (पुरुष) ७ +	१) श्री. चव्हाण भारत फत्तू २) श्री. चौव्हान सोमनाथ देवराम ३) श्री. कोठारीकी ईश्वरराज शरणाप्पा राधानगरी कॉलेज, राधानगरी ४) श्री. गुप्ता गोविंद उमाशंकर (कॉलेज ऑफ फिजीकल एज्यू. वाडीपीयर) ५) श्री. निगडे श्रीधर श्रीकांत ६) श्री. मुद्राळे रोहित मधुकर ७) श्री. पोवार विनायक महादेव ८) श्री. चौगुले ओंकार कृश्णात ९) श्री. मोरबाळे हर्शद भरत (दूध साखर महाविद्यालय, बिद्री) १०) श्री. राजेभोसले दीपराज शहाजी ११) श्री. पाटील पृथ्वीराज बाजीराव (एल. बी. एस कॉलेज, सातारा) १२) श्री. पाटील सौरभ आनंदराव (वाय सी आटर्स आणि कॉमर्स कॉलेज, इस्लामपूर) सांघिक	कास्य पदक

संघव्यवस्थापक – श्री. राहूल एस. लहाणे
